CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०९ एप्रिल २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३६० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### अमेझॉनमध्ये नोकर कपात ?

**नवी दिल्ली :** जागतिक स्तरावर ई–कॉमर्स आणि क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये मक्तेदारी निर्माण करणारी कंपनी मेझॉन सध्या एका मोठ्या संक्रमणातून जात आहे. 'एशिया बिझनेस आउटलुक'च्या ताज्या अहवालानुसार, कंपनीने सुमारे १४,००० कर्मचाऱ्यांना कमी करण्याचे संकेत दिले आहेत. ही कपात केवळ खर्च कमी करण्यासाठी नसून, कंपनीच्या अंतर्गत संरचनेत बदल करण्यासाठी असल्याचे समजते. विशेषतः मध्यम–स्तरीय व्यवस्थापन आणि 'ब्युरोक्रसी' कमी करून निर्णय घेण्याची प्रक्रिया अधिक वेगवान करण्याचा कंपनीचा उद्देश आहे. या कपातीचा सर्वाधिक परिणाम मेझॉन वेब सर्व्हिसेस (–थड), रिटेल आणि मनुष्यबळ विकास (क्ठ) या विभागांवर होण्याची शक्यता आहे.

### ९० लाख नावे वगळली

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीच्या पुनरावलोकन प्रक्रियेत (एसआयआर) एकूण ९०.६६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. आयोगाने ६० लाखांहून अधिक प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर डेटा सार्वजनिक केला असून, प्रथमच जिलानिहाय नावे समाविष्ट व वगळण्याची माहितीही दिली आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.मतदार यादी शुद्धीकरणाची ही प्रक्रिया तीन टप्प्यांत पूर्ण झाली. डिसेंबर २०२५ मध्ये प्रारूप यादी तयार करताना ५८.२ लाख नावे वगळण्यात आली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये अंतिम यादी प्रसिद्ध होईपर्यंत आणखी ५.४६ लाख नावे कमी करण्यात आली. सध्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर व सखोल तपासणीनंतर २७ लाखांहून अधिक नावे वगळण्याचा निर्णय घेण्यात आला असून, एकूण वगळलेल्या नावांची संख्या ९० लाखांपेक्षा अधिक झाली आहे.

### रेपो रेट स्थिर

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) २०२६–२७ आर्थिक वर्षासाठी पहिल्या मौद्रिक धोरण समितीच्या (एमपीसी) बैठकीचे निकाल आज, ८ एप्रिलला जाहीर केले. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलेल्या निकालानुसार, रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्यात आला आहे आणि यामध्ये कोणतीही बदल करण्यात आलेली नाहीत.आरबीआयने पॉलिसी स्टान्स न्यूट्रल ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, हे निर्णय जागतिक स्तरावरील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घेतले गेले आहेत. कर्ज घेणाऱ्यांसाठी महत्त्वाची माहितीजर आपण बँकेकडून फ्लोटिंग रेटवर लोन घेतले असेल, तर सध्या तुमच्या ईएमआयवर कोणताही परिणाम होणार नाही, कारण रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर स्थिर आहे.

### नागपुरात केरोसीनवरून वाद

**नागपूर :** नागपूरमध्ये एलपीजी टंचाईच्या पार्श्वभूमीवर केरोसीन वितरणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. सुमारे ६५० वितरकांनी पेट्रोल पंपांमार्फत वितरणाला विरोध करत रेशन दुकानदारांमार्फतच केरोसीन देण्याची मागणी केली आहे. शासनाने प्रति रेशनकार्ड ३ लिटर केरोसीन देण्याचा निर्णय घेतला असून वितरण पद्धतीवर अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

### घाटगेंचा भाजपमध्ये प्रवेश

**कोल्हापूर :** समरजीत घाटगेंचा आज भाजपमध्ये पक्षप्रवेश पार पडला आहे. रवींद्र चव्हाणांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. विधानसभा निवडणूकीदरम्यान त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. कोल्हापूरच्या कागल मतदार संघातून त्यांनी निवडणूक लढवली होती.

### टँकरने घेतला तरुणीचा बळी

**पुणे :** पुण्यातल्या वानवडी परिसरात भरधाव पाण्याच्या टँकरने एका तरुण इंजिनिअर मुलीचा जीव घेतल्याने शहर पुन्हा हादरलं आहे. ग्रेसिया डॅनियल इसा (वय २४, रा. केदारीनगर) असे मृत तरुणीचे नाव आहे. मंगळवारी सकाळी साडेसातच्या सुमारास गंगा सॅटेलाइट परिसरातील नाल्यावरील पुलाजवळ हा अपघात घडला. ग्रेसिया ही खाजगी कंपनीत इंजिनिअर म्हणून कार्यरत होती आणि त्या दिवशी कामानिमित्त तिला लवकर ऑफिसला जायचे होते.


# युद्धविरामानंतरही इराणमधील तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला

**तेहरान :** अमेरिका आणि इराण यांच्यात (दि.८) जाहीर झालेला दोन आठवड्यांचा युद्धविराम लागू झाल्यानंतर काही तासांतच इराणच्या लावन बेटावरील एका तेल शुद्धीकरण प्रकल्पावर बुधवारी 'शत्रूराष्ट्राकडून' हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. इराणच्या पेट्रोलियम मंत्रालयाचे मुखपत्र असलेल्या 'शाना' वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, नॅशनल इराणीयन ऑईल रिफायनिंग अँड डिस्ट्रिब्युशन कंपनीने या हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

**सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजण्याच्या सुमारास झाला. सुदैवाने, या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि परिसराची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तातडीने सुरक्षा आणि अग्निशमन दलांना पाचारण करण्यात आले होते.

**आमचा पूर्ण विजय : डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा**



एएफपी शी बोलताना अध्यक्ष ट्रम्प यांनी हा करार अमेरिकेचा पूर्ण विजय असल्याचे म्हटले आहे. या करारानुसार, अमेरिका दोन आठवडे इराणवरील हल्ले स्थगित ठेवणार असून, त्या बदल्यात तेहरानने जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'हॉर्मूझची सामुद्रधुनी' तात्पुरती खुली करण्यास संमती दिली होती; परंतु, ताज्या हल्ल्यामुळे या क्षेत्रातील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे.

**युद्धविरामाचा करार**

**वादाच्या भोवऱ्यात**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या 'पूर्णतः नष्ट' करण्याच्या धमकीनंतर, ऐनवेळी युद्ध टाळण्यासाठी दोन्ही देशांमध्ये हा तहाचा करार झाला होता. ट्रम्प यांनी 'इराणी संस्कृती' नष्ट



करण्याची धमकी दिल्यानंतर, ती रोखण्यासाठी अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर सहमती झाली होती. मात्र, बुधवारी केवळ इराणमध्येच नव्हे, तर आखाती देशांमध्येही हल्ले सुरूच राहिल्याने हा करार वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

# एकनाथ शिंदे शिवसेनेत 'भाकरी' फिरवणार ?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०८ एप्रिल :** आगामी राजकीय आव्हाने आणि पक्षांतर्गत मरगळ झटकण्यासाठी शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. जे काम करतील तेच पदावर राहतील, असा इशारा देत त्यांनी शिवसेनेत 'भाकरी' फिरवण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी अकार्यक्षम नेत्यांना घरचा रस्ता दाखवून नव्या दमाच्या शिलेदारांना संधी देण्याची तयारी त्यांनी यानिमित्ताने सुरू केली आहे

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवसेनेच्या दोन मंत्र्यांच्या कामगिरीवर शिंदे प्रचंड नाराज आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये शिंदेंनी स्वतः झंझावाती प्रचार करूनही, काही मंत्री स्वतःच्या बालेकिल्ल्यात पक्षाला अपेक्षित यश मिळवून देऊ शकले नाहीत. नागपूर अधिवेशनावेळीच या मंत्र्यांची गच्छंती होणार होती,

## अकार्यक्षम नेत्यांना दाखवणार घरचा रस्ता; मंत्र्यांपासून शाखाप्रमुखांचे 'रिपोर्ट कार्ड' तयार होणार



मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे हा निर्णय लांबणीवर टाकण्यात आला होता. आता मात्र या मंत्र्यांना डच्चू मिळण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

पक्षात केवळ सत्तेचा लाभ घेण्यासाठी किंवा निधी मिळवण्यासाठी येणाऱ्यांना जागा नाही, असे संकेत उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. आता आपल्याला क्वांटिटी (संख्या) नको, तर क्वालिटी (दर्जा) हवी आहे, अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका नेत्यांकडे स्पष्ट केली आहे. यापुढे मंत्र्यांपासून ते शाखाप्रमुखांपर्यंत प्रत्येकाच्या कामाचा अहवाल तयार होईल. जे प्रामाणिकपणे पक्षवाढीसाठी काम करतील, त्यांनाच भविष्यात मोठी पदे दिली जातील, तर कामचुकारांना पदावरून पायउतार व्हावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मागील आठवड्यात पुण्याची संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त करून शिंदेंनी आधीच आपला इरादा स्पष्ट केला आहे.

शिवसेना आता भारतीय जनता पक्षाच्या धर्तीवर आपली संघटनात्मक रचना अधिक शिस्तबद्ध करत आहे. राज्यातील सर्व ४३ हजार गावांपर्यंत शिवसेना पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रत्येक मतदार यादीवर (बूथ लेव्हल) 'बीएलए' नेमून कामाचा जोर वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आगामी काळात होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेसाठी पक्ष आतापासूनच सज्ज व्हावा, यासाठी मतदार याद्यांवर बारकाईने लक्ष देण्यास सांगण्यात आले आहे. नव्याने जाहीर करण्यात आलेल्या संपर्क प्रमुखांच्या यादीत अनेक आमदार आणि खासदारांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांना केवळ स्वतःचा मतदारसंघ सांभाळून चालणार नाही, तर सोपवण्यात आलेल्या जिल्ह्याचा आणि लोकसभा क्षेत्राचा प्रगती अहवाल वरिष्ठ नेत्यांना सादर करावा लागणार आहे.

# समुद्रात गोल गोल चकरा; चीनकडे निघालेला तेल टँकर अचानक भारताच्या दिशेनं, खोल सागरात नाट्यमय घडामोडी

**बीजिंग/नवी दिल्ली:** मध्य पूर्वेत शस्त्रसंधी झाल्यानं अनेक देशांचा जीव भांड्यात पडला आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे अनेक देशांसमोर इंधन संकट निर्माण झालं होतं. या सगळ्याच देशांना शस्त्रसंधीमुळे दिलासा मिळाला आहे. भारतात तब्बल सात वर्षांनी इराणमधून खनिज तेल येणार आहे. यावेळी या सगळ्या घडामोडींमध्ये एक नाट्यमय वळण आलं आहे. सुरुवातीला चीनच्या दिशेनं निघालेला तेलाचा टँकर आता भारताच्या दिशेनं वळला आहे.

क्युरेको झेंडा असलेला तेलाचा एक मोठा टँकर 'जया' आता भारताच्या पूर्व किनाऱ्याच्या दिशेनं येत आहे. हा टँकर आधी आग्नेय आशियाच्या मार्गानं चीनकडे जात होता. पण त्यानं अचानक मार्ग बदलला आहे. हा बदल केवळ सामान्य व्यापारी निर्णय नाही, तर तो बदलच्या जागतिक परिस्थितीचा संकेत आहे. शिपिंग डेटामधून ही बाब स्पष्ट झाली आहे.

'जया' टँकरमधील तेलाची खरेदी इंडियन ऑईल कॉर्पोरेशननं केली आहे. ही देशातील सर्वात मोठी सरकारी तेल कंपनी आहे. कंपनीनं याबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. भारतानं इराणी तेलाची खरेदी अतिशय वेगात सुरु केल्याचे संकेत मिळू लागले आहेत. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारतानं इराणकडून तेल घेणं बंद केलं होतं.



मात्र अमेरिकेनं निर्बंध उठवल्यानं इराणी तेलाची खरेदी सोपी झाली आहे. जॉर्डन नावाचा आणखी एक टँकरदेखील भारताकडे येत आहे.

अमेरिकेनं इराणवर घातलेल्या निर्बंधांमुळे भारतानं सौदी अरेबिया, इराक आणि अमेरिकेकडून खनिज तेलाची खरेदी सुरु केली होती. पण आता परिस्थिती बदलली आहे. मध्य पूर्वेतील संघर्षामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक जवळपास ठप्प झाली. यानंतर जागतिक पातळीवर तेलाच्या किमती भरमसाठ वाढल्या. त्या नियंत्रणात आणण्यासाठी अमेरिकेनं इराणी तेलावरील निर्बंध उठवले. याचा फायदा इराणसह भारताला होताना दिसत आहे. भारतामधील तेल शुद्धीकरण कंपन्या बऱ्याच कालावधीपासून स्वस्त आणि स्थिर तेल पुरवठ्याच्या शोधात होत्या. त्यांना इराणच्या रुपात चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे. त्यामुळे भारतीय तेल कंपन्यांना फायदा होईल.

# मणिपूरमध्ये पुन्हा भडका! बॉम्बहल्ल्यात दोन मुलांचा मृत्यू

## पाच जिल्ह्यांत इंटरनेट बंदीसह संचारबंदी लागू

**इम्फाळ/वृत्तसंस्था :**

मणिपूरमध्ये पुन्हा एकदा आंदोलनाचे लोण पसरले आहेत. विष्णुपूर जिल्ह्यात सोमवारी मध्यरात्री एका घरावर झालेल्या बॉम्बहल्ल्यात एका पाच वर्षांचा मुलाचा आणि सहा महिन्यांच्या मुलीचा मृत्यू झाला, तर त्यांची आई जखमी झाली आहे. या घटनेनंतर स्थानिकांनी आक्रमक पवित्रा घेत ठिकठिकाणी निदर्शने केली. तणाव वाढल्यामुळे चार जिल्ह्यांत संचारबंदी आणि पाच जिल्ह्यांत इंटनेट सेवा बंद करण्यात आली.

परिसरातील पेट्रोल पंपाजवळील दोन ते तीन टँकर आणि ट्रकला आग लावण्यात आली. मोइरांग पोलिस ठाण्यासमोर टायर जाळण्यात आले. तात्पुरत्या स्वरूपात उभी केलेली पोलिस चौकी उद्ध्वस्त करण्यात आली. संतप्त नागरिकांनी वाहतुकीला अडथळा निर्माण करण्यासाठी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील पांगेई आणि खुराई येथे आणि इम्फाळ पश्चिममधील लंगथाबल येथे वाहनांची वाहतूक थांबवली. रस्त्यांमध्ये टायर जाळले.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सुरक्षा दलांना तैनात करण्यात आले आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंह यांनी हल्ल्याचा निषेध केला. 'हे क्रूर कृत्य आहे. यास जबाबदार असलेल्यांची ओळख पटवून त्यांच्याविरोधात कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल,' असे ते म्हणाले. 'हा मानवतेवरील हल्ला असून मणिपूरमध्ये कष्टाने मिळवलेली शांतता बिघडवण्याचा थेट प्रयत्न आहे.कोणत्याही परिस्थिती हे दहशतवादी कृत्य सहन केले जाणार नाही,' असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. मुख्यमंत्र्यांनी या घटनेत मृत्यू झालेल्या दोन मुलांच्या जखमी आईची खासगी रुग्णालयात भेट घेतली. मोइरांग ट्रोंग्लाओबी चुराचंदपूरच्या डोंगराळ भागाजवळ आहे. २०२३ आणि २०२४मध्ये मैतेई आणि कुकी–झो गटांमधील वांशिक संघर्षादरम्यान येथे सातत्याने गोळीबार झाला होता.

# मुंबईत १०.१४ कोटींचे ड्रग्ज जप्त

## २९ किलो अंमली पदार्थांसह १० आरोपी जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०८ एप्रिल :** अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा मुंबई यांनी विशेष मोहिम राबवत शहरातील विविध ठिकाणी धडक कारवाई करून तब्बल १० आरोपींना अटक केली. या कारवाईत एकूण २९ किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजे किंमत १० कोटी १४ लाख ४६ हजार १०० रुपये इतकी आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईदरम्यान ९०२ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन), २०.७०० किलो गांजा आणि ७.६९० किलो हायड्रोपोनिक गांजा असा मोठा साठा हस्तगत करण्यात आला आहे. १ एप्रिल २०२६ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत वडाळा, अंधेरी, बांद्रा, मालाड, नागपाडा, घाटकोपर, धारावी, माहिम, गोरेगाव आदी ठिकाणी छापेमारी करण्यात आली.

वडाळा बीपीटी रोड परिसरात एमडी विक्री करणाऱ्या आरोपीकडून २१८ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. तसेच विलेपार्ले परिसरातून ७.६९० किलो हायड्रोपोनिक गांजा हस्तगत करण्यात आला. वडाळा टीटी परिसरात २०.७०० किलो गांजा जप्त करण्यात आला, तर नागपाडा भागातून ११७ ग्रॅम एमडी जप्त केले. याशिवाय गोरेगाव, धारावी, अंधेरी व माहिम परिसरातील विविध कारवाईंमध्ये २८१ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. बांद्रा परिसरातून १६३ ग्रॅम एमडी तर मालाड येथून १२३ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले आहे.

या सर्व प्रकरणांमध्ये एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास संबंधित युनिटकडून सुरू आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्षाने राबवलेल्या या विशेष मोहिमेमुळे मुंबईत ड्रग्जविरोधात मोठा आघात बसला असून शहर अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी पोलीस प्रशासन सतर्क असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आज भारतातील ७ राज्यांमध्ये शाळा कॉलेज बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०८ एप्रिल :** भारतातील अनेक राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. केरळ आणि पुदुचेरीमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर अनेक राज्यांमधील शाळा आणि महाविद्यालये बंद राहणार आहेत. ९ एप्रिलला भारतातील ७ राज्यांमध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यासह सरकारी कार्यालये, खाजगी आस्थापने आणि व्यावसायिक आस्थापनांनाही सुट्टी देण्यात आली आहे. सर्वांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा असं अवाहन निवडणूक आयोगातर्फे करण्यात आले आहे.

९ एप्रिल रोजी केरळ आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे, यामुळे शाळांच्या इमारती आणि सुविधांचा वापर मतदान केंद्र म्हणून केला जाणार आहे. विद्यार्थ्यांची गौरसोय होवू नये यासाठी शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. केरळमध्ये १४० विधानसभा मतदारसंघांमध्ये, तर पुदुचेरीमध्ये ३० विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. लाखो मतदार सहभागी होण्याची शक्यता आहे. ही प्रक्रिया सुरक्षित आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासन कडेकोट सुरक्षा व्यवस्थेसह हजारो मतदान केंद्रे उभारणार आहे.

९ एप्रिल रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या मतदानासाठी प्रभावित राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील मतदानाच्या तारखांमुळे शाळा बंद ठेवल्या जाणार आहेत. अधिकृत माहितीच्या आधारे, ९ एप्रिल २०२६ रोजीच्या शाळा आणि महाविद्यालयांच्या सुट्ट्यांची राज्यनिहाय यादी जाहीर करण्यात आली आहे.

**केरळ**

९ एप्रिल रोजी केरळमध्ये १४० विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. सर्व सरकारी, अनुदानित आणि खाजगी शाळा व महाविद्यालये बंद राहणार आहेत. शाळांचा वापर मतदान केंद्र म्हणूनही केला जाणार आहे.

**पुदुचेरी (केंद्रशासित प्रदेश)**

पुदुचेरी विधानसभेच्या ३० जागांसाठी निवडणुका होणार आहेत. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पोलिस बूथ उभारले जाणार आहेत. यामुळे सुट्टी देण्यात आली आहे.

**आसाम**

आसाम विधानसभेच्या १२६ जागांसाठी मतदान ९ एप्रिल रोजी



होणार आहे. शाळांसाठीच्या अधिकृत सुट्ट्यांची सूचना जिल्ह्यानुसार वेगवेगळी आहे. स्थानिक प्रशासने मतदान क्षेत्रांमधील शाळा बंद ठेवण्याची घोषणा केली आहे.

**गोवा**

गोव्यामध्ये २१ पोंडा विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक होणार आहे. ९ एप्रिल रोजी भर पगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही सुट्टी मतदार आणि कार्यकर्त्यांना लागू असली तरी, मतदानाच्या व्यवस्थेमुळे प्रभावित मतदारसंघांमधील शाळा आणि शैक्षणिक संस्था बंद राहण्याची शक्यता आहे.

**कर्नाटक**

कर्नाटकातील काही मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. कायद्यानुसार मतदारांना भर पगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**नागालँड आणि त्रिपुरा**

विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेचा भाग म्हणून नागालँड आणि त्रिपुरा दोन्ही राज्यांमध्ये ९ एप्रिल रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणीस १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ एप्रिल :** हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार लातूर जिल्ह्यात नाफेडच्या वतीने सुरू असलेल्या चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणी प्रक्रियेला आता १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी एम. व्ही. वाजपेयी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

लातूर जिल्ह्यात चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणी प्रक्रिया १ मार्च २०२६ पासून सुरू करण्यात आली होती. यापूर्वी नोंदणीची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली होती. मात्र, जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी शासनाने ऑनलाईन नोंदणीचा कालावधी वाढवून आता १५ एप्रिल २०२६ पर्यंत केला आहे. शासनाने दिलेल्या विहित कालावधीतच नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. ही नोंदणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन असून, कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. लातूर जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आपली नोंदणी केलेली नाही, त्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन त्वरित ऑनलाईन नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पणन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.



## विविध वृत्त...

### यूपीएससीत यशस्वी ठरलेल्या सुरज सूर्यवंशी यांचा घरगुती सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ( युपीएससी) २०२५ परीक्षेत ७०२ वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सुरज माणिकराव सूर्यवंशी यांचा नुकताच साध्या व उत्साहपूर्ण घरगुती कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. डॉ. अनिल भिकाने (संचालक, विस्तार शिक्षण) व सौ. अरुणा भिकाने यांच्या हस्ते हा सत्कार पार पडला. यावेळी श्री. माणिकराव सूर्यवंशी, सौ. सत्यभामा सूर्यवंशी तसेच श्री. विजयकुमार सोळुंके व सौ. उज्वला सोळुंके उपस्थित होते. सुरज हे पूर्वी कोदळी व नळगीर (ता. उदगीर) येथे ग्रामसेवक म्हणून कार्य केलेले आणि सध्या भादा (ता. औसा) येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या श्री. माणिकराव सूर्यवंशी यांचे ज्येष्ठ सुपुत्र आहेत. सामान्य कुटुंबातून येत त्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. लहानपणापासूनच प्रशासनात उच्च पदावर कार्य करण्याचे स्वप्न त्यांनी जोपासले होते. त्यांनी दहावीचे शिक्षण उदगीर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयातून, तर बारावी विज्ञान शाखेत लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर पुणे येथे आबासाहेब गरवारे कॉलेजमध्ये कला शाखेत पदवी शिक्षण घेत त्यांनी युपीएससी परीक्षेच्या तयारीस प्रारंभ केला. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठातून समाजशास्त्र विषयात एम.ए. पूर्ण करत त्यांनी सेट व नेट परीक्षा देखील उत्तीर्ण केल्या आहेत. युपीएससीच्या प्रवासात दोन वेळा मुलाखतीपर्यंत मजल मारूनही अपयश आले; मात्र खचून न जाता त्यांनी चिकाटीने प्रयत्न सुरू ठेवले आणि अखेर २०२५ मध्ये यशाला गवसणी घातली. सत्कार प्रसंगी मान्यवरांनी त्यांच्या जिद्दीचे कौतुक करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सुरज यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक व मार्गदर्शकांना देत शासकीय सेवेतून समाजहितासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### प्रा.एन.जी.स्वामी यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध धम्म संस्काराने अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** भारतीय दलित पँथरच्या समतेच्या संस्काराचा पंधरवडा जिल्हा लातूर अंतर्गत स्मृतीशेष समतारत्न प्रा. एन जी स्वामी यांच्या ७१ व्या जयंतीनिमित्त भारतीय दलित पँथरकडून बहुजन हिताय मुलांचे वस्तीगृह विक्रम नगर लातूर येथे धम्मचारी कल्याणदस्यी यांच्या हस्ते प्रा.एन.जी.स्वामी यांच्या प्रतिमेची बौद्ध धम्म संस्काराने पूजन करून, समतेच्या संसाराच्या पंधरवड्याची सुरुवात करण्यात आली.प्रा.एन.जी.स्वामी यांचे विद्यार्थी रणजित आचार्य यांच्या अध्यतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक विकास वाघमारे,विक्रम नगर,जयंतीउत्सव समितीचे अध्यक्ष श्रीनाथ माने,प्रा.डॉ.राहूल डोंबे,मार्गदर्शक ज्येष्ठ पँथर प्रा.शिवशरण हावळे तर विशेष विशेष उपस्थिती म्हणून उज्वल भारत न्युज चे संपादक विलास घारगावकर उपस्थित होते.

### अपार्टमेंट डिड हरवले आहे

शिरीष भिकाजीराव कुलकर्णी रा. नारायण नगर, आर्य समाज जवळ लातूर व संजीवनी डेव्हलपर्सचे भागीदार संजय मोहन देशपांडे रा. फ्लॅट क्रं . ८०२, संजीवनी अपार्टमेंट, पटवर्धन बॅग, कर्वेनगर, पुणे यांच्यामध्ये सहयोग अपार्टमेंट, सर्वे नंबर ४१/२, बालेवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथील अपार्टमेंट डिड क्रं . सह. निबंधक वर्ग २, हवेली क्रमांक. २१ पुणे यांच्याकडे अनु. क्रं . ४९९८ - २०२१ ( फ्लॅट क्रं . ३०१ ) अन्वये करण्यात आलेल्या अपार्टमेंट डिड चे मूळ दस्तावेज हरवले आहे. ज्या कोणास सापडले असतील त्यांनी कृपया पुढील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

संपर्क :
**शिरीष कुलकर्णी**
**केदार कृपा निवास, नारायण नगर, लातूर**
**मोबाईल नं . ९४२२०७१५९१**

### टि.सी.हरवली आहे

रावसाहेब धोंडिराम वागलगावे या नावाची टि. सी.हरवली आहे.उदगिर येथून राचन्नावाडी कडे दि.०१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता बसने उदगीर येथून राचन्नावाडी कडे प्रवास करित असताना शाहू विद्यालय, शेळगाव रावसाहेब धोंडिराम वागलगावे या नावाची दहावी नापासची टि.सी.व इतर शैक्षणिक साहित्य हरवले आहेत. टि.सी.व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावे.

**रावसाहेब धोंडिराम वागलगावे**
**मो. ८४३२२ ६६३९८**

# ऑनलाईन कोचिंगमुळे विद्यार्थ्यांचा ओघ मंदावला ?

### आगामी काळात लातूरच्या अर्थकारणावर होणार लक्षणीय परिणाम !
### ट्युशन एरियातील अनेक घरांवर 'भाड्याने देणे आहे' चे फलक

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**
**लातूर, दि. ०८ एप्रिल :**



वाढती महागाई आणि सर्वच विषयांच्या ऑनलाईन कोचिंग क्लासेसमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून लातूरकडे येणारा विद्यार्थ्यांच्या ओघ मागच्या काळात मंदावल्याचे निदर्शनास येत आहे. ट्युशन एरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पूर्वीच्या औद्योगिक वसाहतीतील बहुसंख्य घर, इमारतींवर आतापासूनच ' भाड्याने देणे आहे ' चे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. आतापर्यंत शैक्षणिक पंढरी म्हणून ओळखल्या गेलेल्या लातूरच्या अर्थकारणावर यामुळे नजीकच्या काळात लक्षणीय परिणाम होणार असल्याच्या चर्चा वाढीस लागल्या आहेत.

मागच्या काही वर्षात लातूर पॅटर्नच्या गवगव्यामुळे संपूर्ण राज्यात लातूरची शिक्षण क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. ही ओळख निर्माण करणारी मंडळी बाजूलाच राहिली. त्याचा मुबलक लाभ मात्र दुसऱ्याच मंडळींनी उचलण्याचे काम केले. लातूर पॅटर्न काही खाजगी शिकवणीमुळे घडला नव्हता. तसेच त्या पॅटर्नने खाजगी शिकवणीला खतपाणी देण्याचाही प्रयत्न केला नव्हता. परंतु शिक्षण क्षेत्रातील चाणाक्ष लोकांनी त्याला वेगळे रूप देऊन स्वतंत्र व्यवसाय म्हणून नवी ओळख निर्माण करण्यात कमालीचे यश मिळविले. लातूरच्या विकासात औद्योगिक क्षेत्रातील यशासोबत खाजगी कोचिंग क्लासेसचे नावही जोडले जाऊ लागले. अर्थात यात काही बाबतीत तथ्य होते, नाही असे नाही. शिक्षणासाठी राज्यातूनच नव्हे तर देशाच्या अन्य राज्यातूनही विद्यार्थी आणि पालक लातूरला पसंती देत असत.

बाहेरील विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने लातुरात वास्तव्यास येत असल्याने ट्युशन एरिया परिसरात अनेक घर - इमारतींमध्ये कॉट बेसिसवर, स्वतत्र घरे भाड्याने देण्याचे प्रमाण वाढले होते. तसेच अनेक घरांमध्ये खाजगी पातळीवर मेस, भोजनालये, विद्यार्थ्यांना डबे पोहोचवण्याचे कामही वाढले होते. एक प्रकारे हा नवीन घरगुती व्यवसाय वाढीस लागला होता. त्यामुळे छोट्याशा जागेसाठी घर मालकांना वाढीव पैसेही मिळत असत. त्यामुळे ट्युशन एरिया परिसरात फॅमिलीसाठी घर - फ्लॅट भाड्याने देण्याऐवजी विद्यार्थ्यांना कॉट बेसिसवर रूम देण्याची पद्धती रूढ झाली होती. विद्यार्थी आणि पालक ट्युशन पासून जवळ राहण्याची सोय होतेय म्हणून दोन पैसे अधिकचे मोजण्यास तयार होत असत. परिणामतः या भागात खाजगी वसतिगृहे आणि मेसचा व्यवसाय चांगलाच वाढीस लागला होता. पूर्वी राजस्थानमधील कोट्यातही अगदी असेच होत असे. कालांतराने कोट्याची जादू ओसरली. येणाऱ्या काही वर्षात लातूरच्या बाबतीतही अगदी तसेच होण्याची शक्यता बळावत चालली आहे. मागच्या काही वर्षांच्या तुलनेत महागाई बऱ्यापैकी वाढत गेल्याचे निदर्शनास येते. त्यातच सध्याच्या आखाती युद्धामुळेही त्या महागाईत तेल ओतण्याचे काम झाले आहे. अगदी छोट्या छोट्या , दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंचे दरही वाढल्याचे पाहायला मिळतात.

आखाती युद्धामुळे खाणावळीतील भोजनाचे, चहाचे, नाष्ट्याचे दरही वाढल्याचे दिसून येते. गॅस सिलेंडर वेळेत मिळत नाही म्हणून अनेक हॉटेल चालकांना आपला व्यवसाय बंद ठेवावा लागत आहे. या अडचणीमुळे बाहेरगावाहून शिक्षणासाठी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळेत जेवण मिळणेही दुरापास्त झाले आहे. आता शिक्षणाच्या सोयी सुविधा बदलत चालल्या आहेत. कोणत्याही विद्याशाखेचे शिक्षण ऑनलाइनच्या माध्यमातून उपलब्ध झाले आहे. त्यामुळे पालकही आता आपल्या पाल्यांना केवळ लातूरलाच म्हणून नाही तर अन्यत्र कोठेही शिक्षणासाठी ठेवताना ऑनलाईन पद्धतीला प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास येत आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थी आपल्या आई - वडिलांच्या नजरेत, घरी राहूनही शिक्षण घेऊ शकणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्याला आपल्या घरच्या जेवणासोबत कुटुंबियांच्या सान्निध्यात शिकणे शक्य झाले आहे. विद्यार्थी घरापासून दूर राहिला की काय काय होते, हे लातूरमध्ये ज्यांची मुले शिक्षणासाठी , त्या असंख्य पालकांनी पाहिले - अनुभवले आहे.

विद्यार्थ्यांचा लातूरकडे येण्याचा ओघ मागच्या काळाच्या तुलनेत बऱ्यापैकी ओसरला आहे. परिणामतः आतापासूनच ट्युशन एरियातील अनेक घरांवर ' भाड्याने देणे आहेत' चे फलक डकविण्यात आल्याचे पाहावयास मिळत आहेत. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढेल असे संकेत दिसत आहेत. जर त्याप्रमाणे घडले तर लातूरच्या अर्थकारणावर चांगलाच प्रतिकूल परिणाम होणार आहे. कोणतीही गोष्ट अधिक काळ चालत नसते,असे म्हटले - बोलले जाते. ती लातूरच्या ट्युशन एरियाच्या बाबतीतही खरी ठरणार का ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## विलासराव देशमुख शासकीय अतिविशेषोपचार रुग्णालयात मेंदूतील ॲन्युरिझमवर यशस्वी शस्त्रक्रिया

### ७० वर्षीय महिलेला मिळाले नवजीवन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ एप्रिल :** लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय अतिविशेषोपचार रुग्णालयातील डॉक्टरांनी मेंदूतील अत्यंत गुंतागुंतीच्या आणि जीवघेण्या ॲन्युरिझम या आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया करून एका ७० वर्षीय महिला रुग्णाचे प्राण वाचविले आहेत. या यशस्वी उपचारामुळे शासकीय रुग्णालयातील अत्याधुनिक न्युरोसर्जरी सुविधा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

संबंधित रुग्ण महिला डोकेदुखी, उलट्या आणि अचानक शुद्ध हरपणे अशा गंभीर तक्रारींसह रुग्णालयात दाखल झाली होती. तातडीने करण्यात आलेल्या सिटी स्कॅन व एंजिओग्राफी तपासणीत रुग्णाच्या मेंदूतील अँटेरियर कम्युनिकेटिंग आर्टरीमध्ये ॲन्युरिझम फुटल्याचे निदान झाले. ॲन्युरिझम म्हणजे मेंदूतील रक्तवाहिन्या कमकुवत होऊन तयार झालेला फुगवटा. हा फुगवटा फुटल्यास मेंदूत रक्तस्राव होऊन मृत्यूचा मोठा धोका असतो.

रुग्णाची गंभीर प्रकृती पाहता न्युरोसर्जरी विभागाने तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नितीन बर्डे व त्यांच्या तज्ज्ञ पथकाने ॲन्युरिझम क्लिपिंग ही अत्यंत जटिल शस्त्रक्रिया पार पाडली. या प्रक्रियेत फुगलेली रक्तवाहिनी सुरक्षितपणे क्लिप करून रक्तस्राव थांबविण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर आयसीयूमध्ये न्युरोसर्जरी आणि बधिरीकरणशास्त्र विभागाच्या समन्वयाने रुग्णाची विशेष काळजी घेण्यात आली.

ही यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडण्यात विशेष कार्य अधिकारी डॉ. सुनील होळीकर, न्युरोसर्जरी विभागप्रमुख डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. नितीन बर्डे, डॉ. शीतल अग्रोया, डॉ. संगिता कदम, डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर, डॉ. निखिला सुभाषिनी, डॉ. वैजनाथ फड, डॉ. बुमेश्वरी तसेच बधिरीकरणशास्त्र विभागाचे डॉ. विनायक शिरसाठ, विभागप्रमुख डॉ. संगिता आगळे, डॉ. संतोष चिंचकर, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. साईनाथ कुंटे, डॉ. आरती काचेकर व डॉ. सेल्वामूर्ती यांच्या पथकाचा समावेश होता. यावेळी उप अधिष्ठाता डॉ. उमेश कानडे, डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. अजय ओव्हाळ, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड आणि डॉ. महादेव बनसुडे यांची उपस्थिती होती.

**मोफत उपचारांचे आवाहन**

या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली असून नातेवाईकांनी डॉक्टरांचे आभार मानले आहेत. लातूरमध्येच अशा उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध झाल्याने आता गंभीर रुग्णांना मोठ्या शहरात जाण्याची गरज कमी झाली आहे. गरजू रुग्णांनी अशा शस्त्रक्रियांचा लाभ महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून मोफत घ्यावा, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी केले आहे.

## मनपाकडून क्षयरोग रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप

### महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी योगदान दिले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ एप्रिल :** जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आज दि ०७/०४/२०२६ रोजी महापौर जयश्रीताई सोनकांबळे मॅडम,आयुक्त मानसी मॅडम, सभागृह नेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती,सचिन बंडापल्ले,विरोधीपक्ष नेते देविदास काळे,नगरसेवक फारुक शेख,उपायुक्त फड,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.शंकर भारती, वैद्यकीय अधिकारी डॉ.हर्षवर्धन राऊत (जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालय) यांच्या उपस्थितीत १०० क्षयरुग्णांना फूड बास्केट देण्यात आले.

लातूर जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी शासनाकडून औषधींचा मोफत पुरवठा करण्यात येतो.औषधे मिळत असली तरी रुग्ण पूर्णपणे बरा होण्यासाठी पोषण आहार आवश्यक असतो. या उपक्रमात



लोकसहभागातून न्यूट्रिशनल सपोर्ट किट देता येते. या माध्यमातून निक्षय मित्र होता येते अशी माहिती डॉ.हर्षवर्धन राऊत यांनी दिली.

महापौर व आयुक्त यांनी लातूर शहरातील क्षयरोग रुग्णांना फूड बास्केट वितरणासाठी विविध सेवाभावी संस्थांना आवाहन करण्यात आले.आजच्या दिवशी फूड बास्केट चे दाते म्हणून लातूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी योगदान दिले.

तसेच आगामी काळात उपस्थित सर्व पदाधिकारी यांनी सदर मोहिमेचे कौतुक करत त्यांनी देखील या मोहिमेत सहभागी होण्याची सहमती तसेच अधिकाधिक स्वयंसेवी संस्थांना प्रेरित करण्याचे आश्वासन दिले.

## सोशल मीडियाचा मर्यादित वापर केल्याशिवाय प्रगती नाही - चित्रकार शिवाजी हांडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ एप्रिल :** आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात सोशल मीडियाचा अतिरेक टाळून त्याचा मर्यादित वापर करणे आवश्यक आहे. गरज भासल्यास मोबाईलचा 'उपवास' करण्याची सवय लावावी, असे आवाहन प्रसिद्ध चित्रकार शिवाजी हांडे यांनी केले.



संस्कार भारती, देवगिरी प्रांताच्या वतीने तयार करण्यात आलेल्या २०२६-२०२७ या वर्षाच्या दैनंदिनीचे प्रकाशन 'सुर मल्हार' संगीत साधना केंद्र, सौभाग्य नगर, लातूर येथे शिवाजी हांडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रांत अध्यक्षा प्रा. स्नेहलताई पाठक होत्या.

या कार्यक्रमाला प्रांत महामंत्री डॉ. जगदीश देशमुख, उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख, संगीत तज्ञ पंडित संजय जोशी, जिल्हाध्यक्ष जितेंद्र देशमुख, महानगर अध्यक्ष शरद पाडे, प्रांत उपाध्यक्ष डॉ. देवेंद्र कुलकर्णी, सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी, दृश्य कला संयोजक शेषनाथ वाघ, प्रांतमंत्री धनंजय देशपांडे, धाराशिव जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर बन्साळी, उपाध्यक्ष प्रफुल्ल कुमार शेटे, जिल्हा सचिव प्रवीण गोरे, शहर सचिव गणेश कसपटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्येयगीत गायन व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ. जगदीश देशमुख यांनी दैनंदिनीचा उपयोग, अत्याधुनिक जीवनशैली आणि मोबाईल वापराच्या सवयींवर भाष्य केले.

यावेळी बोलताना शिवाजी हांडे म्हणाले की, कलावंत कमी बोलतो, पण आपल्या कलाविष्कारातून अधिक प्रभावीपणे व्यक्त होतो. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये संवाद वाढवून मोबाईलच्या मर्यादित वापराबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा. स्नेहलताई पाठक यांनी संस्कार भारती संस्थेचे कार्य अधोरेखित करत कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधन व राष्ट्रीय विचार रुजविण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच कलावंत समाजाला योग्य दिशा देणारे संदेश आपल्या कलाकृतीतून देत असतात, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनार्दन तळीखेडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रघुनाथ पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सौ. शुभांगी कुलकर्णी यांनी पसायदान सादर केले.

## अग्रलेख...

# महाविकासचा कलगीतुरा

गेल्या काही वर्षांत राज्याच्या राजकारणात झपाट्याने बदल घडत आहेत. विचार बाजूला सारून स्वार्थासाठी युती आणि आघाड्यांचे राजकारण रात्रीतून उदयाला येताना आपण पाहत आहोत. सत्तेसाठी विचारधारांच्या भिंती ओलांडून कोलांटउड्या मारण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. २०१९ मध्ये सुरू झालेला महाविकास आघाडीचा प्रयोगही त्याचेच उदाहरण. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या भिन्न विचारसरणीच्या पक्षांनी तेव्हा एकत्र येऊन सत्ता स्थापन केली; मात्र या आघाडीच्या पायाभरणीतच मोठी विसंगती होती, हे सतत सिद्ध होत गेले आणि बारामती पोटनिवडणुकीच्या निमित्ताने तेच वास्तव पुन्हा एकवार अधोरेखित झाले आहे.

बारामती म्हणजे पवार कुटुंबीयांचा बालेकिल्ला. शरद पवारांनी या मतदारसंघाला, शहराला राष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख दिली. त्यानंतर अजित पवारांनी ही परंपरा पुढे नेत बारामतीचा विकास साधला. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या रिक्त जागेसाठी आता सुनेत्रा पवार मैदानात उतरल्या आहेत. त्यामुळे ही निवडणूक भावनिक, राजकीय आणि प्रतीकात्मक अशा तिन्ही पातळ्यांवर महत्त्वाची ठरणार आहे. अशा वेळी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेनुसार, विशेषतः एखाद्या प्रभावी नेत्याच्या निधनानंतर होणारी पोटनिवडणूक ही बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा असते. सहानुभूतीची लाट लक्षात घेऊन विरोधक अनेकदा निवडणूक लढविणे टाळतात. मात्र बारामतीत असे घडले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे महाविकास आघाडीतील अंतर्गत विसंवाद. एकीकडे महाविकास आघाडीचे जन्मदाते असलेले शरद पवार आणि उद्धव ठाकरे वेगळी भूमिका घेतात, तर दुसरीकडे काँग्रेस वेगळ्या दिशेने धावते. याचा अर्थ अतिशय स्पष्ट आहे आणि तो असा की, येणाऱ्या काळात हे तिन्ही पक्ष एकमेकांसोबत नसतील किंवा असलेच तर ते केवळ सत्तेचे गणित जुळवण्यासाठी असतील.

काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देत महाविकास आघाडीत वेगळी चूल मांडली. बारामतीत उमेदवार उभा करण्यामागे काँग्रेसची अनेक राजकीय गणिते असू शकतात. पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवणे, स्थानिक नेतृत्वाला संधी देणे किंवा आगामी निवडणुकांसाठी संघटन मजबूत करणे यातले काहीही असू शकते. मात्र, बारामतीत सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेसने उमेदवार दिल्यामुळे महाविकास आघाडीतील समन्वयाचा अभाव अधोरेखित झाला आहे हे मात्र खरे. खऱ्या अर्थाने एकसंध महाविकास आघाडी अस्तित्वात असती, तर असा निर्णय एकमताने घेतला गेला असता. काँग्रेसचाच उमेदवार द्यायचा असे ठरले असते तर आघाडीतील अन्य घटक पक्षांनी त्याला पाठिंबा दिला असता. काँग्रेसच्या निर्णयाला रोखण्यात किंवा समन्वय साधण्यात या दोन्ही घटक पक्षांना म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि उद्धव सेनेला अपयश आले. त्यामुळे 'महाविकास आघाडी' ही केवळ नावापुरती राहिली आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.

बारामती पोटनिवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी सुनेत्रा पवारांविरुद्ध उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला. या मुद्यावर महाविकास आघाडी एकसंध राहील, अशी अपेक्षा होती. कारण परंपरेनुसार ही जागा राष्ट्रवादीच्या वाट्याची मानली जाते. मात्र काँग्रेसने अचानक उमेदवार देत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पहिला प्रश्न म्हणजे राष्ट्रवादीने कुठल्याही प्रकारचा संवाद न साधता बारामतीची जागा काँग्रेसला दिली कशी? आणि दुसरा प्रश्न म्हणजे, जर खरोखरच अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या वातावरणात शरद पवारांना ही निवडणूक बिनविरोध करायची होती, तर स्वतःची भूमिका काँग्रेसला समजावून सांगण्यात ते कमी पडले का? यातील तिसरा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, अजित पवारांबद्दल सहानुभूती असताना आणि आघाडीतील घटक पक्ष थेट सोबत नसताना काँग्रेस मैदानात कशासाठी उतरली? या प्रश्नांची उत्तरे येणारा काळ देईल. सध्या मिळालेले उत्तर एवढेच की, महाविकास आघाडीत एकवाक्यता नाही आणि आपसात समन्वय देखील नाही.

बारामती पोटनिवडणूक अजून निकालापर्यंत पोहोचलेली नसली, तरी निवडणुकीआधीच महाविकास आघाडीची 'फजिती' सुरू झाली आहे. यात सर्वाधिक अडचण झाली आहे ती काँग्रेसची. बारामतीत काँग्रेसच्या संघटनाला पूर्वीपासूनच मर्यादा आहेत. त्यात आता महाविकास आघाडीतील घटक पक्ष सोबत नाहीत. त्यामुळे ही निवडणूक काँग्रेसची परीक्षा घेणारी ठरणार आहे. अजित पवारांच्या निधनामुळे सुनेत्रा पवारांबद्दल सहानुभूतीची लाट कायम असताना हा निर्णय घेण्यास काँग्रेसला कोणी बाध्य केले, हाही प्रश्न आहे. राजकारणात कोणत्याही कृतीचा कायम दूरगामी परिणाम होत असतो. तसाच बारामतीच्या या निर्णयाचाही होणार आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात चांगल्या जागा मिळाल्या होत्या. मात्र त्यानंतर अशाप्रकारचे विसंवाद वेळोवेळी समोर आल्याने लोकसभेचा प्रभाव त्यांना कायम ठेवता आला नाही. मतदारांचा विश्वास गमावल्यामुळे विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मतदारांना गृहीत धरून आकड्यांची गोळाबेरीज करणे. आजचा मतदार केवळ आघाडी पाहत नाही, तर त्या आघाडीचा हेतू आणि विचारही पाहतो. कोणत्याही राजकीय पक्षाची खरी शिदोरी त्यांचा दीर्घकालीन विचार आणि विश्वास हीच असते. या शिदोरीशीच खेळण्याचे काम महाविकास आघाडीकडून घडले आहे. काँग्रेसने निवडणूक लढवण्यात काहीही गैर नाही; पण महाविकास आघाडी म्हणून राज्यसभेला एकत्र निर्णय घ्यायचे आणि त्यानंतरच्या पोटनिवडणुकीत स्वतंत्र भूमिका घेत मैदानात उतरायचे, हा दुटप्पीपणा आहे. काल-परवापर्यंत शरद पवारांच्या राज्यसभेवर एकत्र बसून निर्णय घेणारा महाविकास आघाडीतील प्रत्येक घटक पक्ष बारामतीच्या पोटनिवडणुकीत स्वतंत्र कसा झाला, याची उत्तरे आघाडीतील तिन्ही घटक पक्षांना येणाऱ्या काळात द्यावी लागतील. घटक पक्षांच्या अशा भूमिकांमुळे महाविकास आघाडीतील कार्यकर्तेही सैरभैर झाले आहेत. कधी सोबत, कधी विभक्त अशा स्वरूपाचे महाविकास आघाडीचे संधिसाधू राजकारण सध्या महाराष्ट्र अनुभवत आहे. बारामतीसारख्या घटना केवळ स्थानिक पातळीपुरत्या मर्यादित राहत नाहीत तर त्या संपूर्ण राज्याच्या राजकीय चित्रावर दूरगामी परिणाम करतात. मतदारांच्या दृष्टीने आघाडीतील पक्षांमध्येच एकमत नसेल, तर त्याबद्दलचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच, जर एकत्र नांदायचे असेल, तर आगामी काळात महाविकास आघाडीसमोरचे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे राजकीय विश्वास पुन्हा निर्माण करणे हेच असेल. अंतर्गत मतभेद दूर करून एकसंध आणि ठोस वैचारिक भूमिका मांडणे गरजेचे आहे. केवळ सत्तेसाठी एकत्र येणे पुरेसे नसते; तर कार्यकर्त्यांनाही स्पष्ट विचार, दिशा आणि कृती कार्यक्रम देणे आवश्यक असते कारण राजकारणात कार्यकर्ता आणि मतदार हेच खरे केंद्रबिंदू असतात. यातले काहीही लक्षात न घेता महाविकास आघाडीचा कलगीतुरा रंगलाय. तो भविष्यात आघाडीला महाग पडू शकतो. आधीच काँग्रेसची स्थिती चांगली नाही. एकूण महाविकास आघाडीतही फार दम नाही. तरीही तिला राजकीय अस्तित्व टिकवायचे असेल, तर केवळ नेत्यांपुरते मर्यादित न राहता तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत स्पष्ट आणि ठोस संदेश पोहोचवणे आवश्यक आहे. आघाडी म्हणजे केवळ तात्पुरते गणित नसते. ती समान उद्दिष्टांसाठीची बांधिलकी आहे, हे कृतीतून दाखवून द्यावे लागेल. अन्यथा, मतदारांना पर्याय शोधण्यास वेळ लागणार नाही. महाविकास आघाडीने या इशाऱ्याचा गांभीर्याने विचार करून परस्परांतील समन्वय वाढवला, तरच ती पुन्हा सक्षम पर्याय म्हणून उभी राहू शकते. विसंवादाची ही मालिका यापुढेही सुरू राहिली तर त्याची राजकीय किंमत महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षांना मोजावी लागू शकते. त्यामुळेच बारामती पोटनिवडणूक ही केवळ एका मतदारसंघाची निवडणूक नसून महाविकास आघाडीच्या भवितव्याची दिशा ठरवणारी निवडणूक ठरणार आहे. ही आघाडी स्वतःला सावरते की अंतर्गत विसंवादामुळे आणखी कमकुवत होते, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. ▌

## प्रासंगिक

# मिशन कर्मयोगी

**डॉ. जितेंद्र सिंह**

राजस्थानमधील एका दुर्गम भागातील एखाद्या अशा जिल्हाधिकाऱ्याची कल्पना करा ज्यांच्याकडे नुकताच एका महत्त्वाकांक्षी कल्याणकारी योजनेचा कार्यभार सोपवण्यात आला आहे, ज्याबद्दल त्यांना फारशी माहिती नाही. सुमारे दशकभरापूर्वी त्यांच्याकडे कदाचित असलेला मर्यादित स्रोत म्हणजे कडा दुमडलेले जीर्ण सरकारी नियमावली पुस्तक, तीन चार बैठका आणि दुपारचे भोजन झाल्यावर कदाचित काही वेळ काढू शकणारे असे एखादे वरिष्ठ सहकारी किंवा एखादा प्रशिक्षण कार्यक्रम वर्ष-दोन वर्षांनी - आणि तोही झालाच तर - उपलब्ध होईल, हे दूरचे आश्वासन. आज ते जिल्हाधिकारी आपला फोन उचलतात, एकीकृत शासकीय ऑनलाईन प्रशिक्षण मंच म्हणजे आय गॉट वर लॉग इन करतात आणि क्षणार्धात त्यांच्या समोर येतो एक संरचित, क्षमता आधारित अभ्यासक्रम जो खास त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे विकसित केला आहे. संध्याकाळपर्यंत माहितीने परिपूर्ण आणि अधिक आत्मविश्वास असलेले हे जिल्हाधिकारी लाभार्थींच्या पहिल्याच सभेचे अध्यक्षपद भूषवतात. हा बदल वरकरणी छोटासा वाटू शकतो, मात्र खऱ्या अर्थाने तो आमूलाग्र आहे.

ही एक शांत क्रांती आहे जिचा आरंभ पाच वर्षांपूर्वी मिशन कर्मयोगीच्या आरंभापासून सुरू झाला आहे- कोणत्याही गाजावाजासह नव्हे तर अत्यंत संयमाने आणि विशिष्ट उद्दिष्टासह नवीन भारताच्या उभारणीसाठी एका नव्या प्रकारच्या लोकसेवकांच्या नवीन जडणघडणीला आकार देणारी क्रांती. याला इतके महत्त्व का आहे हे समजण्यासाठी आपल्याला सर्वप्रथम त्याचा संदर्भ विचारात घेणे आवश्यक आहे. २०४७ मधील भारत - विकसित भारत, आपल्या पंतप्रधानांच्या संकल्पनेतील भारत - हे काही केवळ एखादे ठिकाण नाही जिथे आपण सहजपणे पोहोचू. हे एक असे स्थान आहे जे आपल्याला बांधायचे आहे, प्रजासत्ताकाचा कारभार चालवणाऱ्या संस्था आणि व्यक्तींच्या माध्यमातून- अतिशय काळजीपूर्वक, एकेक वीट रचून ते उभारायचे आहे. आणि या सूत्रातील सर्वांत मोठा घटक हा भांडवल, तंत्रज्ञान किंवा योजना नव्हे, तर ही एक क्षमता आहे - प्रशिक्षित, प्रोत्साहनाने प्रेरित, नागरिक केंद्रित क्षमता असलेले अंदाजे साडेतीन कोटी लोकसेवक जे रोज सकाळी एका ध्येयासह आपल्या दिवसाची सुरुवात करतात आणि भारतीय राज्यव्यवस्थेला कार्यरत ठेवतात, त्यांची क्षमता.

स्वतंत्र भारताच्या इतिहासातील बहुतांश काळात, ती क्षमता उभारण्याचे जे प्रारूप होते त्याला खंडित प्रारूप म्हणता येईल. नव्यानेच नोकरीवर रुजू होणाऱ्या तरुण अधिकाऱ्याला सुरुवातीच्या काळात औपचारिक प्रशिक्षण मिळत असे, कारकीर्दीच्या मध्यावधी कालखंडात एखाददुसरा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळत असे आणि त्या व्यतिरिक्त प्रत्यक्ष काम करता करता आणि इतरांचे निरीक्षण करून त्याने शिकत जावे ही अपेक्षा केली जात असे. एका स्थिर, मंदगतीने प्रवास करणाऱ्या जगात हे एवढे पुरेसे होते. कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल, लोकसांख्यिक ताण आणि वेगाने होत जाणारे तांत्रिक बदल यांच्या या युगात, हे खरोखरच अपुरे आहे. ज्या वेगाने प्रशासकीय आव्हानांमध्ये बदल होत आहेत त्या वेगाच्या तुलनेत जुन्या पद्धतीच्या प्रशिक्षण व्यवस्थांचा प्रतिसाद देण्याचा वेग अगदीच कुचकामी आहे.

या विसंगतीवर उपाय म्हणून मिशन कर्मयोगीची संकल्पना मांडण्यात आली. २०२१ मध्ये सुरू झालेल्या आणि त्याच वर्षी एप्रिलमध्ये स्थापन झालेल्या क्षमता उभारणी आयोगाने संस्थात्मकरीत्या आधार दिलेल्या या उपक्रमाचा उद्देश अत्यंत महत्त्वाकांक्षी होता, तो म्हणजे भारतीय नागरी सेवांच्या अध्ययन संस्कृतीमध्ये विशिष्ट कालमर्यादित पूर्ण करायच्या अनुपालन प्रक्रियेपासून, विकासाच्या निरंतर तसेच भूमिकेवर आधारित आणि स्वयं-प्रेरित प्रवास असा कायापालट घडवून आणण्याचे ते ध्येय होते. आयोगाच्या मते या बदलाचे वर्णन 'कर्मचारी' म्हणजे नियमांचे पालन करणारा एक कार्यकर्ता यापासून 'कर्मयोगी' म्हणजे उद्देश, सेवा आणि उत्कृष्टतेने प्रेरित सार्वजनिक सेवक होण्याकडे जाणारा हा प्रवास आहे, असे केले जाते.

पाच वर्षांनंतर, ही आकडेवारी बोधप्रद आहे. १.५ कोटींहून अधिक शासकीय अधिकारी आता आय गॉट मंचावर सक्रिय शिकणारे म्हणून सहभागी झाले आहेत. ही संख्या सुरुवातीला कल्पनातीत वाटली असती. या अधिकाऱ्यांनी ४,६०० पेक्षा अधिक कौशल्याधारित अभ्यासक्रमांमध्ये, एकूण ८.३ कोटींहून अधिक अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. केवळ गेल्या राष्ट्रीय शिक्षण सप्ताहामध्येच, सहभागामुळे ४५ लाख तासांची अभ्यासक्रम नोंदणी आणि ३८ लाख तासांचे प्रत्यक्ष शिक्षण साध्य झाले. ही केवळ काल्पनिक आकडेवारी नाही. नोंदवला गेलेला प्रत्येक तास हा भारतातील कुठल्यातरी एका लोकसेवकाचे प्रतिनिधित्व करतो. मग तो छत्तीसगडमधील महसूल निरीक्षक असो, पुण्यातील नागरी स्थानिक संस्थेचा अधिकारी असो किंवा मणिपूरमधील आरोग्य कर्मचारी असो आपल्या सहनागरिकांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी स्वतःच्या क्षमता विकासात गुंतवणूक करत आहे.

आय गॉट मंचाला खरोखरीच परिवर्तनकारी बनवण्यामध्ये केवळ त्याचा आवाका हा एकच घटक कारणीभूत नाही तर त्याची प्रवेश-रचना ही तितकीच महत्त्वाची आहे. हा कुठेही आणि कधीही उपलब्ध आहे, स्मार्टफोनवर किंवा डेस्कटॉपवर, विविध भाषांमध्ये आणि अध्ययन करणाऱ्याच्या व्यक्तिगत व्यावसायिक प्रोफाईल नुसार. यावरील अभ्यासक्रम दर सहा महिन्यांनी अद्ययावत केले जातात, ज्यामुळे प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता उपकरणांचा वापर करणे किंवा नवीन आर्थिक नियमांचे पालन कसे करावे यावरील सामग्री अद्ययावत राहील. वेगळ्या शब्दात सांगायचे तर हा मंच म्हणजे धूळ खात पडलेले एक डिजिटल ग्रंथालय नाही - तर ती अध्ययनाची एक जिवंत आणि परिस्थितीशी जुळवून घेणारी गतिशील परिसंस्था आहे. एखाद्या आदिवासीबहुल जिल्ह्यातील कनिष्ठ अंगणवाडी कार्यकर्तीला जिला तिच्या स्वतःच्या भाषेतून बालकांच्या पोषण मूल्यांकनासंबंधीचे अद्ययावत नियम सांगणारे मॉड्यूल मिळाले आहे अशा एखाद्या सेविकेच्या भूमिकेतून याकडे पाहा. तिला आता प्रशिक्षक तिच्या ब्लॉकपर्यंत येण्याची वाट पाहण्याची गरज नाही. ती शिकते आणि ती कृती करते. हाच या मिशनमधून भारताच्या लोकशाहीला दिला जाणारा मोठा लाभ आहे.

क्षमता निर्माण आयोग हा या परिसंस्थेचा धोरणात्मक संरक्षक असून एकाच वेळी वास्तुविशारद आणि सूत्रसंचालक अशी दुहेरी भूमिका बजावतो. राष्ट्रीय कृषी धोरण आखणाऱ्या सचिवांपासून ते ग्राम पातळीवर त्याची अंमलबजावणी करणाऱ्या पंचायतींमधील कर्मचाऱ्यापर्यंत सार्वजनिक भूमिकांच्या विशाल पटलावर कोणत्या क्षमतांची आवश्यकता आहे, हे निश्चित करते. हा आयोग एनएससीएसटीआय २.० अर्थात राष्ट्रीय सेवा प्रशिक्षण संस्था आराखड्याच्या माध्यमातून देशातील प्रशिक्षण संस्थांसाठी गुणवत्ता मानके निश्चित करतो. याअंतर्गत देशभरातील २०० हून अधिक प्रशिक्षण संस्थांना यापूर्वीच अधिमान्यता देण्यात आली आहे. हे राज्यांसोबत काम करते. आता सर्व ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी औपचारिक सामंजस्य करारांद्वारे यात सहभाग घेतला आहे.

प्रशासकीय विचारसरणीला वसाहतवादी विचारांमधून मुक्ती देऊन भारतीय लोकसेवकांना आधुनिक आव्हानांचा सामना करत असतानाच आधुनिक प्रशासकीय कौशल्यांचा भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाशी पुन्हा एकदा आत्मविश्वासाने मेळ घालण्यास प्रोत्साहित केले जात आहे, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख महत्त्वाकांक्षांपैकी एक आहे; आणि मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून हीच संकल्पना प्रत्यक्षात आणली जात आहे.

**साधना सप्ताह :** देशात २ ते ८ एप्रिल दरम्यान राष्ट्रीय अध्ययन सप्ताह साजरा केला जात असून तो या प्रवासाच्या पंचवर्षपूर्तीचा उत्सव आणि अपूर्ण कामाविषयीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. साधना हा शब्द अतिशय समर्पक आहे. याचा अर्थ होतो - समर्पित सराव, केवळ एखाद्या अलौकिक कृतीद्वारे नव्हे, तर आपल्या कलेप्रति दाखवलेल्या सातत्यपूर्ण निष्ठेद्वारे नैपुण्य प्राप्त करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने केलेले शिस्तबद्ध आणि दैनंदिन प्रयत्न.

**विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट :** सार्वत्रिक आरोग्य संरक्षणापासून ते निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनापर्यंत, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपासून ते उत्पादकतेतील जागतिक नेतृत्वापर्यंत केवळ धोरणांच्या माध्यमातून पूर्ण करता येणार नाही. ते उद्दिष्ट लोकांच्या सहभागातून, अत्यंत अचूकपणे योजना राबवण्याची जाण असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून, अशा नगर नियोजकाकडून, जो स्थानिक माहिती साधने प्रभावीपणे वापरू शकतो; आणि अशा आघाडीवरील आरोग्य सेविकेकडून, जी सार्वजनिक आरोग्याशी संबंधित सूचना आपल्या समुदायापर्यंत अशा पद्धतीने पोहोचवते, ज्यावर त्या समुदायाचा पूर्ण विश्वास असतो. ▌

(लेखक केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच भूविज्ञान (स्वतंत्र प्रभार); पंतप्रधान कार्यालय, अणुऊर्जा विभाग, अंतराळ विभाग आणि कार्मिक, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्तिवेतन मंत्रालय यांचे राज्यमंत्री आहेत.)

## वेध

# निर्जनस्थळाचा एकांत प्रेमीयुगुलांसाठी धोका

**गिरीश शेरेकर**

एकांतवास मिळावा म्हणून प्रेमीयुगुलांचे निर्जनस्थळी फिरण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. काहीवेळा त्यांचे फिरणे अगदी सहजतेने होते तर बहुतांशवेळा त्यात अडचणी येतात. त्यातली काही प्रकरणे सहज निकाली निघतात तर काही जीवावर बेतणारी किंवा आयुष्याच्या वाटचालीला गालबोट लावणारी ठरतात. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात असे प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. राज्यभरात होणाऱ्या एकूण घटनांपैकी अंगावर बेतणाऱ्या गंभीर घटनांचीच बातमी फक्त होते म्हणून ते चव्हाट्यावर येतात. उर्वरित ९५ टक्के घटना तर बदनामीच्या भीतिपोटी समोरच येत नाही. दोन सज्ञान व्यक्ती परस्पर संमतीने एकत्र जाऊ-येऊ शकतात. बसून बोलूसुद्धा शकतात. यात सांगायचा मुद्दा इतकाच की, अनेक युगुलांना सुरक्षित व असुरक्षित ठिकाण कोणते, हेच समजत नाही. शहराला लागून असलेले जंगल क्षेत्र, छोट्या टेकड्या, तलाव हेच त्यांना एकांतवासाची चांगली ठिकाणे वाटतात. पण, दुसऱ्या बाजूने लूटमार, चोऱ्याचपाट्या आणि अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांची पण ठिकाणे हीच असतात. हे भामटे कायम शिकार शोधत असतात. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी उपरोक्त ठिकाणी जाणारे युगुल त्यांच्या जाळ्यात सहज अडकतात. त्यांच्या मागण्या अमर्याद असतात आणि यांना बदनामीची भीती असल्याने ते पूर्ततेला तयार होतात.

अमरावती शहराला लागून असलेल्या भानखेडा जंगल परिसरात अशीच एक घटना नुकतीच रात्रीच्यावेळी घडली. अतिशय संतापजनक ही घटना असून प्रेमात आंधळे झालेले युगुल किती बिनधास्त असते याचे ते उदाहरण आहे. ज्या भानखेडा जंगल भागात हे युगुल गेले होते, तो भाग कायम निर्जन असतो आणि युगुलांसाठी तर फारच धोकादायक आहे. त्यातही रात्रीची वेळ असेल तर सांगायचीच गरज नाही. येथे वन्यप्राण्यांचाही वावर असतो. इतकी भयानक स्थिती असताना युगुलांनी तेथे रात्रीच काय दिवसा तरी जावे का? याचे उत्तर नाही असेच आहे. प्रेम आंधळे असले तरी ते कुठेही जाऊन व्यक्त करायचे नसते आणि केले तर काय होते, हे अमरावतचीच्या घटनेतून स्पष्ट झाले आहे. यातले युगुल जेमतेम सज्ञान झाले. पण, ते हिंमतबाज आहे ही जमेची बाजू ठरली. इतका कठीण प्रसंग त्यांच्यावर ओढवल्यानंतर ते खंबीरपणे कुटुंबीयांपर्यंत पोहोचले. पुढे दवाखाना आणि पोलिसांकडे गेले. त्यामुळे पुढच्या आवश्यक त्या सर्व प्रक्रिया तातडीने करणे दोन्ही यंत्रणांना लगेच शक्य झाले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून रात्रीचा दिवस करत घटनेत सहभागी पाचही आरोपींना अटक केली. कायद्यातल्या तरतुदीनुसार आरोपींची ओळख परेड झाली आहे. पीडितेने न्यायाधीशांसमोर आरोपींना ओळखले आहे. तपास पूर्ण करून हे प्रकरण जलदगती न्यायालयात ठेवण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. आरोपींना लवकरच कठोरातील कठोर शिक्षा होईल, असा विश्वास व्यक्त करणाऱ्या पोलिसांचे अभिनंदन!

सामूहिक अत्याचाराच्या अशा घटना कोणत्याही शहरासाठी भूषणावह नाहीत. आपले शहर म्हणा किंवा जिल्हा कायम सुरक्षित राहावा, याची जबाबदारी पोलिसांचीच आहे. पण, कुठे जावे आणि कुठे जाऊ नये हे जाणाऱ्यांनी विचारपूर्वक ठरविणे सुद्धा अत्यावश्यक आहे. अमरावतीच्या घटनेतले आरोपी पोलिसांनी ज्या खबरी नेटवर्कमधून ताब्यात घेतले, ते नेटवर्क जर कायमस्वरूपी वापरले तर कोणत्या भागात काय सुरू आहे आणि कुठे सामान्य माणसांना धोका आहे, हे वेळीच लक्षात येऊ शकते. पण, आपल्याकडे घटना घडल्यावरच हातपाय हलविण्याची सवय आहे. ती फक्त पोलिसांनाच नाही. सर्वच विभागात हीच स्थिती आहे. प्रत्येकच घटनेचा दोष शासकीय यंत्रणेवर टाकून जमणार नाही. समाजाची आणि त्यात वावरणाऱ्या व्यक्तींचीपण सर्तकता मोलाची असते. शहाण्या व्यक्तींनी एकमेकांच्या प्रेमात पडणे वाईट नाही आणि त्याला बंधन सुद्धा नाही. फक्त हे प्रेम समजूतदारपणे करणे आणि व्यक्त होणे महत्त्वाचे आहे. हौस म्हणून ते करण्यासारखे अजिबातच नाही. चूक येथेच होते आणि भलत्याच ठिकाणी जाऊन व्यक्त झाल्यावर संकट कोसळते. ज्यांच्यावर असे कठीण प्रसंग ओढवले आहेत, त्यांना त्या दाहकतेची कल्पना आहे. जे युगुल अशा चक्रव्यूहात अडकले असेल त्यांनी वेळीच सावध होणे गरजेचे आहे. अमरावतीच्या घटनेतून त्यांनी बोध घ्यावा. आयुष्याच्या वाटेवर निर्णय घेताना चांगल्या व वाईट परिणामांची मीमांसा पहिले करावी. करता येत नसेल तर जवळच्या जाणकार व्यक्तींचा सल्ला घ्यावा. शंभरदा विचार करून कृती करावी आणि धोके टाळावे, हीच अपेक्षा! ▌

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# तेरा अक्षरी श्रीराम मंत्राचे रहस्य!

**प्रा. दिलीप जोशी**

'श्रीराम जयराम जय जय राम' हा तेरा अक्षरी श्रीराम मंत्र आहे. या मंत्राचा जप सर्वत्र होत असतो. हा तारक मंत्र असून या मंत्राच्या प्रभावाने भवसागर सहज पार करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी येते, हा आपला दृढ विश्वास आहे. श्रीराम मंत्र साक्षात भगवान सदाशिव महादेव सदैव स्मरतात. हरिपाठात 'आत्मा जो शिवाचा रामजप' हे स्पष्ट सांगितले आहे. याशिवाय 'पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मीकि, नामे तिन्ही लोकं उद्धरती' हे माउलींनी सांगून रामनामाचा महिमा विशद केला आहे.

श्रीराम हा मंत्र म्हणजे अग्निबीज आहे. त्याच्या आर्त उच्चाराने शरीर तप्त होते. याची प्रचीती एकदा घेऊन पाहिली पाहिजे. एका अर्थाने रामनामाने नैसर्गिक तप होतो. हा तेरा अक्षरी मंत्र मराठीत आहे आणि तो अलिकडच्या कोणी सिद्ध पुरुषाने आपल्या सर्वांना दिला, असा अनेकांचा गैरसमज आहे. या तेरा अक्षरी मंत्राचे रहस्योद्घाटन आज आपण करण्याचा प्रयत्न करू.

विविध उपनिषदांमध्ये 'श्रीरामरहस्योपनिषद' नावाचे उपनिषद आहे. या उपनिषदात कथा आलेली आहे. एकदा मुद्गल ऋषी, शांडिल्य ऋषी, पिंगल ऋषी, सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार एकत्रित चर्चा करीत असताना तारक ब्रह्म कोण आणि तारक मंत्र कोणता यावर संवाद सुरू झाला. त्याचे खरे उत्तर कोणाकडून मिळेल, अशी मंत्रणा सुरू झाली. या प्रश्नाचे उत्तर 'बुद्धिमतां वरिष्ठम्' असलेले भगवान हनुमंतराय देतील म्हणून ही सर्व मंडळी मारुतीरायाकडे आली. तेव्हा मारुतीरायांनी त्यांना त्वरित सांगितले की, तारक ब्रह्म म्हणजे भगवान श्रीराम.

**'एतेषु चैव सर्वेषु तत्त्वं च ब्रह्म तारकम् ।**
**राम एव परं ब्रह्म तत्त्वं श्रीरामो ब्रह्म तारकम् ॥'**

या ऋषींनी हनुमंतरायांना तारक मंत्राबाबत विचारले तेव्हा मारुतीरायांनी त्यांना विविध असे श्रीराम मंत्र सांगितले. त्यात त्यांनी एकाक्षर राममंत्र, दोन अक्षरी, तीन अक्षरी असे एकूण जवळ जवळ सत्तेचाळीस अक्षरी म्हणजे एकूण सत्तेचाळीस श्रीराम मंत्र सांगितले. सर्वसामान्यांसाठी तारक मंत्र म्हणून तेरा अक्षरी 'श्रीराम जयराम जय जय राम' हा मंत्र त्यांनी सांगितला. श्रीराम रहस्य उपनिषदात या मंत्राचा श्लोक आहे.

**'श्रीरामेति पदं चोक्त्वा, जय राम ततः परम् ।**
**जय द्वयं वदेत् प्राज्ञो, रामेति मन्त्रराजकः ॥'**



भगवान हनुमंतरायांनी हा मंत्र संस्कृत श्लोकातून विशद केला. पहिल्यांदा श्रीरामेती पदं म्हणजे श्रीराम जय राम ततः म्हणजे त्यानंतर जयराम येईल. पुढे जय द्वयं म्हणजे जय जय म्हणावे. त्यानंतर रामेती म्हणजे शेवटी राम असे सांगितले. म्हणजे 'श्रीराम जयराम जय जय राम' हा तेरा अक्षरी मंत्र तयार होतो. यावरून लक्षात येईल की, तेरा अक्षरी मंत्र प्रत्यक्ष हनुमंतरायांनी सनतकुमारादी ऋषिमुनींना सांगितला. हा मंत्र श्रीरामरहस्योपनिषदात आहे.

या उपनिषदातच हनुमंतरायांनी विविध अक्षरी मंत्रांचे विधान सनकादी ऋषींना सांगितले. त्यात तेरा अक्षरी हा सर्वाभिष्ट मंत्र असून या मंत्र जपात मंत्र, तंत्र आणि यंत्र यांचेही विश्लेषण आहे. या मंत्राचे पुरश्चरण विधानही उद्धृत केले आहे. मारुतीराय स्पष्ट करतात की, 'र' हे अक्षर निरंजन ब्रह्म आहे तर 'आ' हे मायातत्त्व तर त्यापासून बनलेले 'रा' हे प्राणतत्त्व तर 'म' हे उन्नती दर्शक आहे. राम हे निरंजन ब्रह्म जीवाची उन्नती म्हणजे मानवाचा माधव करणारे सिद्ध तत्त्व आहे. वेदाचे महावाक्य 'तत्त्वमसि' यातील 'रा' हे तत्पद, 'म' हे त्वं पद तर 'राम' हे असीपद असल्याचेही हनुमंतराय स्पष्ट करतात. असा हा सिद्ध आणि तारक मंत्र असून याचे प्रकट कर्ते ऋषी मारुतीराय आहे.

पुढे हा मंत्र श्रीरामसंप्रदायात प्रचलित झाला. श्रीरामानुजाचार्य परंपरा, रामानंदी परंपरा, समर्थ रामदासी परंपरा, सद्गुरू गोंदवलेकर, सद्गुरू प्रल्हाद महाराज यांनी या मंत्राला विशेष महत्त्व प्राप्त करून दिले. उपासनेत या मंत्राची प्रचीती सर्वांना येत गेली आणि हा मंत्र सिद्ध, अतिसिद्ध, परमसिद्ध झाला. हा मंत्र प्रचंड प्रभावी आहे. तेरा अक्षरी मंत्र जपाने-

१) कलिकाळ त्यासी न पाहे दृष्टी
२) पळे भूतबाधा येणे तेथे
३) म्हणती जे वाचा तया मोक्ष
४) पापाचे कळप पळती पुढे
५) अनंत पाप राशी, जातील लयाशी
६) पापे अनंत कोटी गेली त्याची
७) जळतील पापे जन्मांतरीची
८) पवित्रची होय देह त्याचा

-अशी संतांची अनेक प्रमाणे आहेत; ज्यातून रामनाम माहात्म्य स्पष्ट होते. म्हणून श्रीराम नाम जप रोज केला पाहिजे. 'श्रीराम जयराम जय जय राम' हा जीवनाचे कल्याण करणारा, भवसागर पार करून ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा मार्ग सोपान आहे. ▌

९८२२२६२७३५

### महंत मधुसूदन भारती यांचे प्रायोपवेशन

महंत मधुसूदन भारती यांचे श्री दत्तशिखर माहूर येथे चार तप वास्तव्य होते. ते एक तप पूर्ण झाल्यानंतर मंदिराची परिक्रमा करायला बाहेर निघायचे व त्याचवेळेस भक्तांना दर्शन द्यायचे. मंदिरात त्यांची एक खोली होती त्यात ते तप करायचे. आम्ही दरवर्षी माहूरला जातो. एकदा आठ दहा वर्षांपूर्वी आम्ही गेलो तेव्हा ते त्यांच्या खोलीतून बाहेर परिक्रमा करायला निघाले होते. त्यांचे ते कठोर तप करून तेजस्वी झालेले रूप पाहून डोळे दिपून गेले. क्षणभर डोळ्यासमोर श्रीगुरुदत्ताची मूर्तीच उभी आहे की काय, असे वाटले. नकळत डोळे मिटून नतमस्तक झालो. त्यांनी आम्हाला आशीर्वाद दिला व भस्म दिले. आमचे नशीब चांगले होते की आम्हाला त्यांचा आशीर्वाद मिळाला. नुकतीच ते वैकुंठवासी झाल्याची बातमी वाचली तेव्हा डोळ्यात पाणी आले. स्वर्गात श्रीगुरुदत्त चरणी त्यांना स्थान मिळाले. भक्तिपूर्वक त्यांच्या चरणी नमन.

**राजेंद्र वाडी**/९४२३६३२२३०

### तक्रार करण्याची गरज काय?

प्रवाशांची अडवणूक थांबणार कधी? ही बातमी वाचली (तरुण भारत, पुणे) त्यात उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी अडवणूक झालेल्या प्रवाशांना तक्रारी करण्याचे आवाहन केले आहे. हे वाचून हसावे की रडावे तेच कळत नाही. या प्रश्नाला तरुण भारतने वाचा फोडल्याबद्दल अभिनंदन. यासंबंधी पूर्वीही अनेक वर्तमानपत्रांतून बातम्या आलेल्या आहेत, वाचकांच्या प्रतिक्रियाही आलेल्या आहेत. मी स्वतः सुद्धा या अनुभवातून गेलो आहे आणि विविध वर्तमानपत्रांत लिहिलेही आहे. हे प्रकार जवळपास गेले वर्षभर तरी सुरू आहेत. दहापैकी नऊ टॅक्सीवाले प्रवाशांची अशी लूटमार करत आहेत. तरीही प्रादेशिक परिवहन विभाग या संघटित लुटमारीबाबत अनभिज्ञ असावा हे आश्चर्यकारक आहे.

पूर्वीच्या काळात राजे महाराजे वेषांतर करून समाजात चाललेल्या गैरप्रकारांचा छडा लावत असत आणि त्यावर त्वरित आणि उचित कारवाई करून उपाययोजनाही करत असत. असे करणे परिवहन विभागाला अशक्य आहे का? सध्याच्या काळात एवढी जागरूक प्रसारमाध्यमे आणि मुबलक, अद्ययावत यंत्रणा असूनही सरकारी विभाग कारवाई करण्यासाठी तक्रारींची वाट बघत असतील तर प्रवाशांनी काय करावे? लोक आपापली कामे सोडून तक्रारी करत आणि खेट्या मारत बसतील का?

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### भारत-नेपाळ संबंध सुधारतील?

रामनवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि नेपाळ यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे कारण पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून त्यांनी भारताविरुद्ध एकही वक्तव्य केले नाही. अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारतविरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते. आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही, कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशांत मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. अर्थात त्यांच्याकडून तशी अपेक्षा करायला हरकत नाही. कारण बालेंद्र शहा आणि आपले खूप जवळचे संबंध आहेत. बालेंद्र शहा यांचे शिक्षण भारतातच झाले आहे. त्यांनी बंगळुरूच्या विश्वेशरय्या विद्यापीठातून स्ट्रक्चरल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले आहे. त्यांची एक बहीण बंगळुरूमध्येच राहते. त्यामुळे भारताबाबत त्यांच्या मनात निश्चितच आदर असेल. अर्थात त्यांच्या मनात चीनबद्दल असलेले आकर्षण लपून राहिलेले नाही. असे असले तरी पंतप्रधान म्हणून ते चीनच्या मागे लागणार नाहीत अशी आशा करूया.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### लखनौमध्ये नोकरीसाठी तरुणांच्या रांगा

वरील आशयाची बातमी वाचून फारच आनंद झाला कारण लखनौमधील अलिगंज या आयटीआय परिक्षेत्रात रोजगार मेळावा भरला होता. तेथे हजारो तरुणांच्या रांगा लागल्या होत्या. विशेष आनंद याचा वाटला की उत्तरप्रदेशमध्ये जर असे रोजगार मेळावे लागले आणि तेथे जर नोकऱ्या मिळाल्या तर तेथील तरुणांचे मुंबईला येणे थांबेल. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रोजगार देऊन तरुणांना तेथेच थांबवले तर त्यांना मुंबईमध्ये येण्याची गरज भासणार नाही. असेच प्रकार सर्व राज्यांत घडले तर बिहार, पश्चिम बंगाल ओडिशामधून मुंबईमध्ये येणारे तरुणांचे लोंढे थांबतील. नाहीत मुंबईला आल्यावर कुठेही रस्त्यावर भाजीचा ठेला किंवा रस्त्यावरचे अनेक उद्योग करायला हे मोकळे असतात म्हणूनच आज लखनौमध्ये जे घडत आहे तसं जर सर्व राज्यांमध्ये घडले तिथला तरुण मुंबईमध्ये कशाला येईल? ▌

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पोलिस कर्मचाऱ्याची आत्महत्या, घरात कुणी नसताना उचललं टोकाचं पाऊल

तभा वृत्तसेवा

**बीड |** बीडमध्ये पोलिस कर्मचाऱ्याने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली. राहत्या घरी त्याने गळफास घेत आयुष्य संपवलं. बीड शहरातील नगर रोडवर ही घटना घडली. हा पोलिस कर्मचारी माजलगाव शहर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. बाळकृष्ण जायेभाय (वय ४२ वर्षे) असं आत्महत्या केलेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव होते. या घटनेमुळे बीडच्या पोलिस दलामध्ये खळबळ उडाली आहे. त्याच्या आत्महत्येमागचं कारण समोर आले नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, बाळकृष्ण जायेभाय हे नगर रोडवरील समर्थ मंगल कार्यालयाच्या मागील बाजूल असलेल्या लोकाशा नगरमध्ये कुटुंबीयांसोबत राहत होते. त्यांनी राहत्या घरातच गळफास घेत आयुष्य संपवलं. बाळकृष्ण जायभाय हे सध्या माजलगाव शहर पोलिस ठाण्यात कार्यरत होते. त्यांनी आत्महत्या का केली? यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यांचा मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

पोलिस दलामध्ये कर्तव्यदक्ष, मनमिळावू म्हणून आणि सर्वांशी प्रेमाने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून बाळकृष्ण जायभाय ओळखले जात होते. बाळकृष्ण जायभाय यांनी बीड स्थानिक गुन्हे शाखा तसेच गेवराई पोलिस ठाण्यात कर्तव्य बजावले होते. यामुळे ते बीड जिल्ह्यात चांगले परिचित होते. त्यांच्या अशा अचानक जाण्यामुळे पोलिस दलात आणि आसपासच्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्याच्या आत्महत्येचा तपास शिवाजीनगर पोलिस करत आहेत.

# आपण कोणाला दोष द्यायचा नाही आणि कोणाचा द्वेष करायचा नाही, नियती सगळे काही नीट करते : धनंजय मुंडे

## भगवानगडाची ऐश्वर्यसंपन्नता महंत डॉ. नामदेव शास्त्रींनी अबाधित राखली; मुंडेंचे बडेवाडी येथील नारळी सप्ताहात विधान

तभा वृत्तसेवा

**पाथर्डी (प्रतिनिधी) |** कोणी आपल्याला दोष देवो किंवा आपलं द्वेष करो, आपण मात्र कोणाला दोष द्यायचा नाही किंवा कुणाचा द्वेष करायचा नाही नियती सर्वांचा हिशोब नीट करत असते असे वक्तव्य माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्यावतीने पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे आयोजित अखंड नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात धनंजय मुंडे बोलत होते.



भक्ती, शक्ती आणि विश्वासाची भगवानगडाची परंपरा आहे. लाखो ऊसतोड कामगार आपल्या एक रुपया कमाईतील वीस पैसे देणगी भगवानगडाला देतात आणि त्यातूनच या गडाची महती आज देश विदेशात पोहोचली आहे. ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबांनी भगवान गडाची गादी ही ऐश्वर्या संपन्न बनवली ऐश्वर्या संपन्नतेची ती परंपरा आभारीत राखण्याचे काम आज गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव शास्त्री यांच्यामार्फत केले जात असल्याचे विधानही यावेळी धनंजय मुंडे यांनी केले.

भगवानगड हे आपले ऊर्जा स्थान असून भगवानगडाच्या सावलीत आपल्याला नेहमी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी व्यासपीठावर महंत डॉ. नामदेव शास्त्री, गडाचे उत्तराधिकारी ह. भ. प. कृष्णा महाराज शास्त्री, आईसाहेब संस्थानच्या ह. भ. प. राधाताई सानप, खा. निलेश लंके, आ. मोनिकाताई राजळे, माजी आ. बाळासाहेब आजबे, ॲड. प्रताप ढाकणे, ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांसह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आधी बडेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी धनंजय मुंडे यांची जंगी मिरवणूक काढत फुलांची उधळण करत जोरदार स्वागत केले. उमापूर येथे नारायणगडाच्या सप्ताहासही दिली भेट, महंत शिवाजी महाराजांचे घेतले आशीर्वाद

दरम्यान बडेवाडी येथे जाण्याअगोदर धनंजय मुंडे यांनी गेवराई तालुक्यातील उमापूर येथे श्री क्षेत्र नारायणगडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थिती लावली. यावेळी गडाचे महंत ह. भ. प. शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी ग्रामस्थानी धनंजय मुंडे यांचे स्वागत केले, यावेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हेही उपस्थित होते.

# जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने चक्रधर नगर येथे जागतिक आरोग्य दिन कार्यक्रम संपन्न




तभा वृत्तसेवा

**बीड |** कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीड व डॉ.नरवडे आयुर्वेद व पंचकर्म सेंटर यांच्या सहकार्याने दीनदयाल शोध संस्थान येथे जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आरोग्यविषयक माहिती व मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले .कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या प्रसिद्ध आयुर्वेद तज्ञ डॉ. सौ अंबिका नरवडे मा. श्रीमती सुनंदा कुलकर्णी, जनशिक्षण संस्थांनचे संचालक श्री गंगाधर देशमुख, कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनुरकर उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात डॉ. नरवडे ताई यांनी पंचकर्म दिनचर्या, योग, प्राणायाम ,वमन ,बस्ती सुवर्णप्राशन व १६ संस्कार याबाबत सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात श्री गंगाधर जी देशमुख यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले की सर्वांनी आपापल्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे डॉक्टर अंबिका नरवडे यांनी त्यांचा खूप किमती वेळ आपल्यासाठी दिला आहे त्या सर्वांची आरोग्य तपासणी करणार आहेत या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ सीमा मनूरकर यांनी केले आभार सुमेधा मनसबदार यांनी तर सूत्रसंचलन सहायक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी केले.कार्यक्रमानंतर महिला व पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी, नानाजी देशमुख विद्यामंदिर व शिशुवाटिकेच्या शिक्षिका व परिसरातील महिला पुरुष यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाचे कार्य कौतुकास्पद : राजकिशोर मोदी

## वधु - वर परिचय पुस्तिका प्रकाशन, समाजभूषण पुरस्कार वितरण

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** दिवसेंदिवस बिकट बनत चाललेल्या विवाह समस्ये विषयी जागरूकता निर्माण करीत अनेक विवाह जुळविणाऱ्या योगेश्वरी वधु-वर मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते ०६ एप्रिल सोमवार रोजी योगेश्वरी वधु वर सूचक मंडळाच्या वधु-वर परिचय पुस्तिका प्रकाशन व समाजभुषण पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

अध्यक्षीय समारोपात गदाधर बुवा रामदासी यांनी वधु-वर सूचक मंडळाच्या कार्याचे कौतुक करून समाज भुषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. मान्यवरांचे स्वागत बाबुराव बाभुळगांवकर,अशोक टाकळकर,राहूल देशपांडे,राजश्री पिंपळे,कल्याणी सोनेसांगवीकर,आदींनी केले.प्रास्तविक श्रीपाद चिक्षे यांनी केले संचालन आनंद टाकळकर यांनी तर उपस्थितांचे आभार स्मिता भातलवंडे यांनी मानले. यावेळी विविध संघटनाचे पदाधिकारी संचालक,महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**यांना प्राप्त झाले पुरस्कार**
**अध्यात्मिक कार्य - कमलाकर देशपांडे वधु-वर सूचक मंडळ कार्य-प्रभाकर सेलमोकर सामाजिक कार्य-स्वरूपा कुलकर्णी शैक्षणिक कार्य-एस.डी.खडके**

अध्यक्षस्थानी राम मंदीर चे मठाधिपती गदाधर बुवा रामदासी होते. व्यासपीठावर अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, दिनदयाळ ना. सह.बँकेचे अध्यक्ष ॲड. मकरंद पत्की,माजी नगरसेवक संजय लोणीकर,ह.भ. प. अंबादास महाराज चिक्षे,योगेश्वरी देवल कमेटीचे संचालक उल्हास पांडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मोदी म्हणाले की,सामाजिक क्षेत्रात योगेश्वरी वधु- वर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने सामाजिक जबाबदारीचे जे बहुमोल कार्य केले आहे ते अवर्णनीय आहे. त्यांच्या प्रयत्नातून अनेक विवाह जुळले अलिकडच्या काळात वधु वर सूचक मंडळ काळाची गरज बनल्याचे सांगून ज्यांना समाजभुषण पुरस्कार मिळाले त्यांची जबाबदारी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

# मित्रांनी वाढदिवसाला डावलल्याने तरुणानं उचललं टोकाचं पाऊल

## अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथील एका तरुणाने मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक घटना समोर

तभा वृत्तसेवा

**बीड |** मैत्रीमध्ये झालेला छोटासा वाद आणि त्यानंतर वाढदिवसाच्या सेलिब्रेशनमधून डावलल्या गेल्याच्या भावनेतून एका २४ वर्षीय तरुणाने आपले जीवन संपवल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथे घडली आहे. महेश उद्धव भणगे असे या तरुणाचे नाव आहे. ऐन उमेदीच्या वयात त्याने उचललेल्या या पावलामुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महेशने मंगळवारी (७ एप्रिल) दुपारी आपल्या राहत्या घरात विषारी औषध प्राशन केले. दुपारी तो घराच्या छतावर एकटाच झोपण्यासाठी गेला होता. तेथे त्याने पाणी पिण्याच्या तांब्यात विषारी द्रव्य मिसळून प्यायले. बराच वेळ झाला तरी महेश खाली का आला नाही, म्हणून कुटुंबीयांनी रात्री ८ वाजेच्या सुमारास छतावर जाऊन पाहिले असता तो बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



वाढदिवसाचे सेलिब्रेशन अन् डावलल्याची भावना

महेशचे त्याच्या काही मित्रांसोबत काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. गेल्या सोमवारी (६ एप्रिल) त्याच्या एका जवळच्या मित्राचा वाढदिवस होता. नेहमी मित्रांच्या प्रत्येक कामात आणि वाढदिवसाच्या नियोजनात पुढाकार घेणाऱ्या महेशला यावेळेस मात्र मित्रांनी बोलावले नाही. त्याला सोडून सर्व मित्रांनी वाढदिवस साजरा केल्यामुळे महेश प्रचंड मानसिक दडपणाखाली होता.

'माझं दुःख कोणाला सांगू?'... स्टेटस ठरलं अखेरचं

आत्महत्येपूर्वी मंगळवारी दुपारी महेशने आपल्या मोबाईलवर एक भावूक स्टेटस ठेवले होते. माझं दुःख कोणाला सांगू, मी एकटा पडलोय, अशा शब्दांत त्याने आपली व्यथा मांडली होती. या स्टेटसवरून त्याला आलेला एकटेपणा आणि खोलवर गेलेले नैराश्य स्पष्टपणे दिसून येत आहे. ज्या मित्रांसाठी त्याने नेहमी धावपळ केली, त्यांनीच शेवटच्या क्षणी साथ सोडल्याचे शल्य त्याला सहन झाले नाही.अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी या घटनेचा पंचनामा केला असून, अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**वडिलांनी शेती विकून स्वप्न केलं होतं पूर्ण**

महेश हा कुटुंबाचा आधार होता. मुलाच्या हट्टासाठी आणि त्याच्या भविष्यासाठी वडिलांनी आपली शेती विकून त्याला अंबाजोगाई शहरात कपड्याचे दुकान टाकून दिले होते. व्यवसाय करून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे स्वप्न पाहणाऱ्या महेशने अशा प्रकारे अनपेक्षित एक्झिट घेतल्याने भणगे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# अखिल भारतीय काँग्रेसच्या संघटन सृजन अभियानास उत्सपूर्द प्रतिसाद

## समाजातील शेवटच्या घटकाला संघटन सृजन अभियान न्याय देईल ; नीतू वर्मा सोईन

तभा वृत्तसेवा

**माजलगाव (प्रतिनिधी ) |** अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यभारत पक्षीय संगघटनात्मक बदल फेरबदल करण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खरगे व विरोधीपक्ष नेते खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली संघटन सृजन अभियान सुरु असून,शहरातील शासकीय विश्रामगृह येथे सदरील कार्यक्रम कार्यकर्त्यांच्या उत्सपूर्द प्रतिसादात अखिल भारतीय काँग्रेसच्या नेत्या सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात संपन्न झाला.



यावेळी संघटन सृजन अभियान या कार्यक्रमासाठी दिल्लीहुन मुख्यनिरीक्षक श्रीमती नीतू वर्मा सोईन सह माजी आमदार एम एम शेख,संघटन निरीक्षक सुरेंद्र खोडजकर, प्रदेश समन्वयक सौ विद्याताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्यनिरीक्षक नीतू वर्मा सोईन यांनी उपस्थित कार्यकर्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकाला पक्षाचे संघटन सृजन अभियान न्याय देत सर्व स्तरातील लोकांना पक्ष संघटनेत सामावून घेऊन पक्ष मजबूत करू, तसेच यावेळी प्रत्येक कार्यकर्त्यांचं वैयक्तिक म्हणणं ऐकून सामान्य कार्यकर्त्यांचं पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मत घेतले.सदरील कार्यक्रमास तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे,जिल्हाउपाध्यक्ष महावीर मस्के,वरिष्ठ जिल्हाउपाध्यक्ष प्रवीण शेफ, वरिष्ठ नेते बाळासाहेब ठोंबरे, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी,शेख अहेमद, कल्याण भारस्कर, सिद्धार्थ घडसे, अशोक कांबळे, हरिभाऊ चाळक, सतीश चाळक, जाणू शहा, हनुमान थोरात, संकेत कासार,अक्षय थोरात, दिपक क्षीरसागर, कृष्णा शिंदे, करामा चाऊस, फारुख शेख,किशोर कांबळे, सुधाकर कांबळे,असद काझी,कमलेश कांबळे, बंडू अडागळे, श्रीमंत कांबळे, रसीद शेख सह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडमध्ये भैरवनाथांच्या दर्शनासाठी भाविकांची रिघ

तभा वृत्तसेवा

**बीड, ०८ एप्रिल |** वाळुंज येथील भैरवनाथ यात्रेनिमित्त आमदार सुरेश धस यांच्या हस्ते अभिषेक व महाआरती करण्यात आली. भैरवनाथांच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. वाळुंज परिसरातील मंगरूळ, चिखली, टाकळसिंग जामगाव, देव्हीघव्हाण, पारगाव, केळसांगवी, हिंगणी, डोणगाव, सांगवी या गावातल्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. पर जिल्ह्यात नोकरी व व्यवसायाच्या निमित्त असलेले अहिल्यानगर, पुणे, मुंबई, पनवेल, छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यात्रेनिमित्त कुस्त्यांचा फड रंगला.

# केकतसारणी येथील बहुचर्चित महादेव मंदिराचा निकाल ग्रामपंचायतच्या बाजुने, केज न्यायालयाचा महत्वपूर्ण निकाल

तभा वृत्तसेवा

**केज /प्रतिनिधी |** केज तालुक्यातील केकतसारणी येथील बहुचर्चित महादेव मंदिराचा निकाल ग्रामपंचायतच्या बाजुने लागला आहे.केज न्यायालयाच्या या महत्वपूर्ण निर्णयाचे सर्वत्र स्वागत केले आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज दिवाणी न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक १५८/२०२५नानाभाऊ विरुद्ध ग्रामपंचायत केकतसारणी दावा दाखल केला होता. सदरील प्रकरणात नानाभाऊ सोनाजी भोईटे यांनी ग्रामपंचायत केकतसारणी यांच्या विरुद्ध गावठाणच्या जागेवर महादेव मंदिर बांधू नये म्हणून दावा दिला होता व मनाई हुकूमचा अर्ज दिला होता व केकतसारणी ग्राम पंचायतला प्रतिवादी केले होते.सदरील प्रकरणात प्रतिवादी कडुन दावा दाखल करून मनाई हुकुम अर्ज दाखल केला होता.दिवाणी व फौजदारी न्यायाधीश कुलकर्णी मॅडम यांच्या न्यायालयासमोर प्रकरण चालले व प्रकरणातील दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकून सदरील प्रकरणात वादी यांचा मनाई हुकूमाचा अर्ज खारीज करण्यात आला प्रति दाव्यातील प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात आला.त्यामुळे महादेव मंदिर बांधकामा साठीचा मार्ग मोकळा झाला आहे.सदरील प्रकरणात जेष्ठ विधीज्ञ एम.एस लाड,ए. एल. लाड,एस.एस.भांगे, जे.जी.बारगजे यांनी कामकाज पाहिले. निकाल आल्यानंतर ग्राम पंचायत व ग्रामस्थांच्या वतीने विधीज्ञ मंडळीचा शाल,श्रीफळ,पुष्पहार व बुके देऊन सत्कार करण्यात आला.



# अंबाजोगाईत ट्रकच्या धडकेत बँक अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** बीडच्या अंबाजोगाई शहरात भीषण अपघाताची घटना घडली आहे. अंबाजोगाई शहरात रिंग रोडवरील मानवलोक कार्यालयाजवळ आज बुधवारी सकाळी भीषण अपघातात बँक अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीवरून बँकेत जाताना पाठीमागून येणाऱ्या एका भरधाव ट्रकने अधिकाऱ्याला धडक दिली. या धडकेत बँक अधिकाऱ्याच्या मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. आज बुधवारी सायंकाळी त्यांच्या मूळगावी उजनी येथे त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, सुदर्शन टाक असे बँक अधिकाऱ्याचे नाव आहे. सुदर्शन हे सकाळी दुचाकीवरून कामासाठी निघाले होते. तथागत चौकाजवळ पोहोचल्यानंतर रिंग रोडवरून प्रवास करताना एका अनियंत्रित आणि भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर मार लागल्याने सुदर्शन टाक याचा घटनास्थळी जागीच मृत्यू झाला.

सुदर्शन टाक हे मूळचे उजनी गावचे रहिवासी आहेत. सुदर्शन हे बँक परिवारात त्यांच्या मनमिळाऊ आणि शांत स्वभावासाठी परिचरित होते.

अपघात झाल्याची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तातडीने घटनेचा पंचनामा केला केला आहे. बँक अधिकाऱ्याचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या अपघाताचा पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला आहे.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना 10% आरक्षणासह सेवा लाभ द्या - आ. धस

तभा वृत्तसेवा

**बीड, ०८ एप्रिल |** "ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना १०% आरक्षणाच्या माध्यमातून सेवा अंतर्गत सर्व लाभ देणे अत्यावश्यक आहे," अशी ठाम भूमिका आमदार सुरेश धस यांनी मंत्रालयात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत मांडली. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत जिल्हा परिषदेमध्ये समाविष्ट ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.



या बैठकीत आमदार धस यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे "विशेष बाब" म्हणून पाहून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. त्यांनी स्पष्ट केले की, दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या सेवा लाभांमुळे कर्मचारी वर्गात असंतोष निर्माण झाला असून, हा प्रश्न सोडवणे शासनासाठी अत्यंत गरजेचे आहे. ग्रामपंचायत कर्मचारी हे ग्रामीण प्रशासनाचा कणा मानले जातात. मात्र, जिल्हा परिषदेत समाविष्ट झाल्यानंतरही त्यांना अनेक ( मूलभूत सेवा लाभांपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब बैठकीत अधोरेखित करण्यात आली. बैठकीदरम्यान संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली. कर्मचारी वर्गाच्या हितासाठी योग्य तो निर्णय लवकरात लवकर व्हावा, यासाठी ठोस पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले.

मंत्री जयकुमार गोरे यांनीही या विषयावर सकारात्मक भूमिका दर्शविल्याची माहिती सूत्रांनी दिली या बैठकीत मंत्री जयकुमार गोरे यांच्यासह पाटोद्याचे भूमिपुत्र व जयकुमार गोरे यांचे शासकीय सहाय्यक सुनील कोठेकर हे देखील उपस्थित होते. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये आशावादाचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# स्मारक समितीकडून महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती उत्सव ; त्यानिमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन : डॉ.राजेश इंगोले

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** येथील महात्मा ज्योतिराव फुले स्मारक समिती अंबाजोगाई यांच्या वतीने रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिराव फुले व संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला. या जयंती उत्सावानिमित्त महात्मा फुले स्मारक स्थळावर शालेय विद्यार्थ्यांसाठी, महाविद्यालयीन तरूणांसाठी तसेच महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

या संयुक्त जयंती विशेष स्पर्धा महोत्सव २०२६ खालील प्रमाणे होणार आयोजित करण्यात आल्याची माहिती स्पर्धेचे समन्वयक प्रा.मिलिंद ढगे व सचिव रत्नदीप गोरे यांनी दिली आहे. स्पर्धेचे ठिकाण - महात्मा फुले स्मारक समिती महात्मा फुले स्मारक रोड, एल.आय.सी ऑफिसच्या जवळ, अंबाजोगाई (जिल्हा बीड) स्पर्धेचे वयोगट पुढीलप्रमाणे आहेत. बालगट (इयत्ता १ली ते ४ थी) - रंगभरण स्पर्धा दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ सायंकाळी ६ ते ७ वाजता. सहभागी स्पर्धकांना महापुरूषांचे चित्र दिले जाईल चित्रात आकर्षक रंग भरायचे आहेत. स्पर्धकांनी रंग स्वतः घेऊन यावेत. आयोजकांकडून फक्त ड्रॉइंग पेपर दिला जाईल. सामान्यज्ञान स्पर्धा - गट १ (इयत्ता ५ वी ते ८ वी), विषय - जीवनचरित्र, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ दुपारी २ ते ३ वाजता. गट २ (इयत्ता ९ वी ते १२ वी) विषय - सामाजिक व शैक्षणिक कार्य, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ दुपारी ३ ते ४, खुला गट (पालक, माता, गृहिणी, व्यावसायिक व १९ वर्षांवरील) विषय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांचे राष्ट्र उभारणीत योगदान, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ सायंकाळी ६ ते ७, महिलांसाठी विशेष स्पर्धा ठेवण्यात आल्या आहेत. ज्यात रांगोळी स्पर्धा, विषय - महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचे रांगोळी रूपात सादरीकरण, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वेळ सकाळी ८ ते ९ वाजता. सदरील स्पर्धेचे वैशिष्ट्ये - समाजप्रबोधनाचा संदेश,



सर्जनशीलतेला प्रोत्साहन, सर्व वयोगटांसाठी संधी उपलब्ध करून देणे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. विजेत्यांस सन्मानचिन्ह व तसेच आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी संपर्क - ९८५०१८९२३७ / ८२७५४८६६४३ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, सचिव रत्नदीप गोरे, उपाध्यक्ष अनिल नरसिंगे, कोषाध्यक्ष संजय साळवे, सुनील नरसिंगे, हेमंत धानोरकर, प्रा. आदित्य कदम, विजय कचरे, रामेश्वर खाडे, भाऊराव गवळी यांनी केले आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# केळी उत्पादकांना हेक्टरी ७४ हजारांचा पीकविमा मंजूर

## प्रताप देशमुख, संदीप देशमुख, हणमंत राजेगोरे यांच्या लढ्यास यश

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ८ एप्रिल -**

गतवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. बारड महसूल मंडळासाठी हेक्टरी तब्बल ७४,६७८ रुपयांचा वाढीव पीकविमा मंजूर करण्यात आला असून काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, संदीपकुमार देशमुख, शेतकरी संघटनेचे हणमंत राजेगोरे यांच्या दीर्घ पाठपुराव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

मुदखेड व अर्धापूर तालुक्यांमध्ये जून महिन्यातील वादळी वारे आणि अतिवृष्टीमुळे सुमारे चार हजार हेक्टरवरील केळी पिकाचे प्रचंड नुकसान झाले होते. सुरुवातीला विमा कंपनीने दावे नाकारल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. मात्र, सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा प्रश्न



मार्गी लागला. या प्रकरणात काँग्रेसचे युवा कार्यकर्ते प्रा. संदीपकुमार देशमुख बारडकर आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हणमंत राजेगोरे, मुदखेड तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी प्रशासन व संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरावा करत शेतकऱ्यांच्या बाजूने ठोस मांडणी केली. विशेष म्हणजे, स्वयंचलित हवामान केंद्रातील तांत्रिक बिघाडामुळे झालेल्या त्रुटींचाही मुद्दा त्यांनी अधोरेखित केला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निकषांच्या आधारे हस्तक्षेप करत प्रकरणाचा पुनर्विचार केला आणि शेतकऱ्यांना न्याय देणारा निर्णय घेतला. यापूर्वी बारड मंडळासाठी केवळ ३२ हजार रुपये मंजूर होते; मात्र पुनर्विचारानंतर त्यात मोठी वाढ करण्यात आली. याशिवाय, मुदखेड, मालेगाव, मुगट व दाभड भागांसाठी हेक्टरी ७४,६७९ रुपये, तर अर्धापूर व भोसी भागासाठी ४२,५०० रुपये पीकविमा मंजूर करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे बारड मंडळातील केळी उत्पादकांना मोठा आर्थिक आधार मिळणार असून, प्रशासनाच्या भूमिकेचे सर्वत्र स्वागत होत आहे.

> गेली सहा वर्षे पीकविमा व इतर प्रश्नांवर आमचा लढा सुरू आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे शेतकऱ्यांना न्याय मिळाला,
> **– हणमंत राजेगोरे**
> **जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

> पीकविम्याच्या संदर्भातील आमचा संघर्ष अजून संपलेला नाही. स्वयंचलित हवामान केंद्रांतील त्रुटी दूर करून त्यांची योग्य ठिकाणी उभारणी करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भातील आमचा पाठपुरावा सुरूच राहणार आहे.
> **– प्रा. संदीपकुमार देशमुख**
> **काँग्रेस कार्यकर्ते, भोकर विधानसभा.**

# विविध वृत्त...

## निवळीत बाबा सैलानी उर्स शरीफ संदल उत्साहात

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ८ एप्रिल -**

मुखेड तालुक्यातील ग्राम निवळी येथील माळावर स्थित नवीन बांधकाम केलेल्या हज़रत बाबा सैलानी दर्गाह उर्स संदल शरीफ सोमवार दि.६ एप्रिल रोजी सबंध जिल्हाभरातून आलेल्या भाविक भक्तगण व गावकऱ्यांकडून वाजत गाजत पारंपरिक उत्साहात भव्यदिव्य साजरा करण्यात आला.सायंकाळी ठीक मगरिब नंतर येथील लोकप्रिय हज़रत नियाज अलिशा खादरी सदर खलिपा यांच्या घरातून संदलला सुरूवात झाली.संदलची मिरवणूक आतषबाजीत हनुमान मंदिर,गाव परिसरातून नागा नाईक तांडा परिसरातील नव्याने बांधकाम केलेल्या बाबा सैलानी दर्गाह ठिकाणी रात्री नऊ वाजता पोहोचली.यावेळी लोकप्रिय हज़रत खमर अलिशा खादरी सदर सरगिरू बोधन व इतर मुर्शद हजरत,दर्गाह मुतवल्ली अब्दुल निजामशा खादरी,मुतवल्ली हुसेन निजामशा खादरी यांची उपस्थिती होती. दर्गाह परिसरात गावातील भाविक व शिष्य गणांना जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री अकरा वाजता दणदणीत कव्वालीचा कार्यक्रम ठेवण्यात आला. सुप्रसिद्ध कव्वाल गायक सलीम कार्लेकर( बिलोली)पार्टी व ताजोद्दिन ब्रदर्स चोंडी,मुखेड, मराठी चित्रपट संगीतकार प्रा.संदीप भुरे,अशोक भालेराव, गंगाधर भालेराव,तरूण भारत पत्रकार जाफर आदमपूरकर, बुद्धीवंत पवार,देविदास शेरे,ढवळे,निवळी सरपंच शिवसांब अप्पा मठपती, उपसरपंच संभाजी माळेगावे, भास्कर पाटील,पोलीस पाटील, आजी माजी पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक,समस्त गावकरी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.

## दिव्यांग-निराधार बांधवांची एकदिवशीय बैठक संपन्न

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ८ एप्रिल -**

मुदखेड तालुक्यातील दिव्यांग,निराधारांची दि.६ एप्रिल रोजी मुदखेड येथील शासकिय विश्रामग्रह येथे एक दिवसिय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुंबई मंत्रालयावर आंदोलन कशा प्रकारे करावे व ६ हजार रुपये वाढीव मानधना बद्दल सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीला अध्यक्ष म्हणुन लाभलेले तहसिल विभागाचे शासकिय कर्मचारी दत्तराम पाटिल गिरे हे होते. यावेळी गिरे यांनी योग्य असं सखोलपणे दिव्यांग ,निराधारांना मार्गदर्शन केले व सर्व दिव्यांग,निराधारांना मानधना बद्दल केवायसी करण्यासाठी आव्हान केले. लाभार्थांनी जर केवायसी नाही केली तर शासनाच्या वतीने आपले मिळणारे मानधन लवकरचं बंद होऊ शकते अशा सुचना यावेळी करण्यात आले.यावेळी उपस्थित प्रहार ता.महिला अध्यक्ष सौ.केशरताई शिंदे पाटिल ,प्रहार मा.तालुका अध्यक्ष अनिल शेटे पा.राजवाडीकर, शंकरराव शिंदे पाटिल, साहेबराव निवडंगे,विलास पा.पवार,रामराव पा.पावडे व मुदखेड ग्रामीण मधून आलेले आमचे असंख्ये दिव्यांग,निराधार अनाथ,व वयोवृध्द बांधवांनी बैठकीला हजरी लावली होती. या बैठकीचे सुत्रसंचालन अनिल शेटे पाटिल तर कार्यक्रामाच्या समारोप प्रसंगी शंकरराव शिदे पाटिल यांनी सर्व बैठकीला उपस्थितांचे आभार मानले.

## भोकरमध्ये एचपीव्ही लसीकरण प्रारंभ

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ८ एप्रिल -**

येथील ग्रामीण रुग्णालयात गर्भाशयमूख कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी १४ ते १५ वयोगटातील मूलीसाठी एचपीव्ही लसीकरणाची सूरुवात ६एप्रिल रोजी करण्यात आली जागतीक महिला दिनापासून या लसीकरणाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.लसीकरणासाठी पालकांनी आपल्या पाल्यांना ग्रामीण रुग्णालय भोकर येथे घेवून यावे येताना मूलीचे आधारकार्ड सोबत आणावे असे आवाहन वैद्यकिय अधिक्षक डॉ.प्रताप चव्हाण यांनी केले.आरोग्य निरिक्षक सत्यजित टिप्रेसवार वैद्यकिय अधिकारी डॉ.ज्योती यन्नावार डॉ.अपर्णा जोशी डॉ.अविनाश गूंडाळे आदि ग्रामीण रुग्णालयातील परिचारीका आरोग्य कर्मचारी अभियानात परिश्रम घेत आहेत.

## भोकर येथे एलपीजी तुटवड्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे धरणे आंदोलन

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ८ एप्रिल -**

देशभरात निर्माण झालेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने राज्यभर आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनाला प्रतिसाद देत भोकर तहसील कार्यालयासमोर दि.0६ सोमवारी सकाळी ११.३0 वाजल्या पासून एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांच्या आवाहनानुसार नरेंद्र, कब मिलेगा सिलेंडर?या घोषवाक्याखाली राज्यभर हे आंदोलन करण्यात आले.त्याचाच एक भाग म्हणून भोकर तालुक्यात स्थानिक शाखा नसतानाही निष्ठावान कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत आंदोलन उभारले या आंदोलनाचे नेतृत्व समन्वयक ड. सिद्धार्थ कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आंदोलना दरम्यान तहसीलदारांच्या मार्फत राज्यपाल व मुख्यमंत्री मुंबई यांना निवेदन पाठविण्यात आले.यावेळी माजी सरपंच आनंदराव एडके,सुभाष तेले, ग्यानु चव्हाण,राहुल एडके, पुंडलिक कांबळे, प्रमोद गौवंदे,ड प्रसेनजीत एडके,आकाश कंधारे,दिलीप चव्हाण,प्रसाद शहाणे,बाबुराव सोनकांबळे,गंगाधर एडके ,समता सैनिक दलाचे राजु दांडगे ,उत्तम एडके,प्रल्हाद एडके,चंद्रकात कदम,भिम शाहीर बाबुराव गाडेकर,प्रविण एडके,रमेश गायकवाड,लक्ष्मण मोरे,किशोर धमसे,यशवंत धमसे, प्रकाश भुसेवाड,आनंद आनेबोईनवाड, साहेबराव नरोटे ,गौतम चव्हाण,सुमेध जाधव, विलास देवके,तुकाराम वाघमारे,राजेश चंद्रे, आर बी गायकवाड,बुद्धभूषण एडके,संजय गर्जे,यांच्यासह तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट शहरात उन्हाळ्यात पाणीटंचाई भासणार नाही; पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी यांचे आश्वासन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ८ एप्रिल** -उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणीटंचाईची समस्या उग्र रूप धारण करते. मात्र, यंदा किनवट शहरातील कोणत्याही प्रभागात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भासू नये, गळती थांबावी आणि पाण्याचा अपव्यय टाळला जावा, यासाठी नगर परिषदेने कंबर कसली आहे. नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी यांनी शहरातील प्रत्येक प्रभागात पाणीपुरवठा दुरुस्तीची कामे युद्धस्तरावर हाती घेतली असून, या तत्परतेमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात किनवटमधील अनेक प्रभागांत पाणीटंचाईची समस्या निर्माण होते. यावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सभापती निलोफर भाटी यांच्या सूचनेनुसार पाणीपुरवठा विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

शहरातील ज्या ठिकाणी पाईपलाईनला गळती आहे किंवा सार्वजनिक नळांना तोट्या नसल्यामुळे पाणी वाया जात आहे, अशा सर्व ठिकाणी नवीन तोट्या बसवण्याचे काम वेगाने सुरू आहे.

'पाण्याचा प्रत्येक थेंब वाचला पाहिजे' या उद्देशाने राबवल्या जात असलेल्या या मोहिमेअंतर्गत, सभापतींनी प्रत्यक्ष प्रभागात जाऊन आढावा घेतला. यावेळी अनेक ठिकाणी गेल्या कित्येक वर्षांपासून दररोज हजारो लिटर पाण्याची नासाडी होत असल्याची गंभीर बाब निर्दशनास आली. याची दखल घेत, ज्या भागात कमी दाबाने पाणी येते किंवा तांत्रिक अडचणी आहेत, त्या त्वरित सोडवण्याचे आदेश त्यांनी कर्मचाऱ्यांना दिले आहेत. गेल्या आठवडाभरात शहरात ५०० पेक्षा अधिक नळांना मजबूत व दर्जेदार तोट्या बसवण्यात आल्या असून, यामुळे पाण्याची मोठी बचत होत आहे.

प्रशासनाने उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच दाखवलेली ही सक्रियता पाहून किनवटच्या नागरिकांनी पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी व नगर परिषदेच्या कार्याचे कौतुक केले आहे. या मोहिमेमुळे कडक उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.



> उन्हाळ्यात शहरवासीयांना पाण्याची समस्या उद्‌भवू नये यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. गळती रोखून प्रत्येक घरापर्यंत मुबलक आणि सुरळीत पाणीपुरवठा करणे हाच आमचा ध्यास आहे. आवश्यकतेनुसार बोअरवेल व पाण्याचे टँकर सुद्धा उपलब्ध करून देण्यात येतील.
> **– निलोफर निसार भाटी**
> **(पाणीपुरवठा सभापती, नगर परिषद किनवट)**

## संगीतकार दशरथ पुजारी यांच्या अजरामर गीतांची मैफल सावळ्या विठ्ठला, सांस्कृतिक कार्य विभागाची सांगीतिक मानवंदना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ एप्रिल** - ज्येष्ठ संगीतकार दशरथ पुजारी यांच्या अजरामर गीतांची मैफल *सावळ्या विठ्ठला* हा सांगीतिक कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम गुरुवार, ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता कुसुम सभागृह, व्ही.आय.पी. रोड, नांदेड येथे संपन्न होणार आहे.

संगीतकार दशरथ पुजारी हे मागच्या पिढीमधील नामवंत संगीतकार आहेत .त्यांची सांगीतिक कारकिर्द खूप मोठी आहे . केशवा माधवा , देव माझा विठू सावळा , या लाडक्या मुलानो,झिमझिम झरती श्रावण धारा ,अजून त्या झुडुपांच्या मागे अशी अनेक गाणी रसिकांच्या मनावर आजही अधिराज्य करत आहेत. त्यांच्या संगीतातील भक्तीविचारांनी महाराष्ट्रातील वारी परंपरा, संत साहित्य आणि समाजातील ऐक्यभाव अधिक दृढ केला आहे त्याच बरोबर भावसंगीत ही त्यांनी एका उंचीवर नेवून ठेवले आहे .त्यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा आणि गाणी असा कार्यक्रम आयोजित केला आहे

या कार्यक्रमाची निर्मिती व संकल्पना संगीतकार आनंदीविकास यांची असून सागर जाधव, शेफाली कुलकर्णी, वर्षा जोशी हे गायक कलावंत सहभागी असणार आहेत. विकास देशमुख, विवेक कयाळ,विश्वेश्वर कोलंबीकर,पंकज शिरभाते, भगवानराव देशमुख, श्रीनिवास लंकावाड,शेख नईम ,शेख इस्माईल हे वादक कलावंत सहभागी आहेत तर संवादक म्हणून पद्माकर कुलकर्णी असणार आहेत. आजच्या पिढीसाठी जुन्या संगीताचा प्रेरणादायी ठरणारा हा कार्यक्रम आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. ड. आशिष शेलार तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव श्री. डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. नांदेड व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, संगीत,साहित्यासह सर्वच रसिकांनी या विशेष कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांगीतिक मैफिल लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# देगलूरात भाजपाचा ४६ वा वर्धापन दिन जल्लोषात साजरा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ८ एप्रिल -**

भारतीय जनता पार्टीचा ४६ वा वर्धापन दिन देगलूर येथे उत्साह, एकात्मता आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांच्या कार्यालयात भारत माता, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. 'राष्ट्र प्रथम' या विचाराने प्रेरित होत विकसित व सशक्त भारत घडवण्याचा संकल्प तसेच भारतीय संस्कृती जपण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

आमदार अंतापूरकर यांच्या निवासस्थानी वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले व त्यानंतर आमदार जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



पक्षाने दिलेल्या विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीसंदर्भात बैठकही घेण्यात आली. कार्यक्रमादरम्यान पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा केला. तसेच भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा संक्षिप्त इतिहास दर्शविणारे आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर आमदार अंतापूरकर यांच्या निवासस्थानी लावण्यात आले होते, जे उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी भाजपा आध्यात्मिक आघाडीचे नेते राजेश महाराज देगलूरकर यांनी पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासावर प्रकाश टाकत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पक्षाची विचारसरणी, कार्यपद्धती आणि देशहितासाठी केलेल्या कार्याचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. दरम्यान, देगलूर-बिलोली मतदारसंघाचे आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी सर्व भाजपा कार्यकर्त्यांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देत राष्ट्रनिर्मितीसाठी प्रत्येकाने सक्रिय योगदान द्यावे, तसेच पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवून समाजहितासाठी काम करावे, असे आवाहन अंतापुरकर यांनी केले.

या कार्यक्रमास भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अशोक साखरे, जिल्हा चिटणीस अनिल पाटील खानापूरकर, मंडळ अध्यक्ष देगलूर शहर प्रशांत दासरवाड, संजीव पांचाळ, दिपक संगमकर, अशोक डुकरे, मुकुंद भुताळे, मुन्ना पबितवार, ताराकांत पाटील, देविदास वाघमारे खानापूरकर, प्रशांत पाटील आचेगावकर, बसवंत गोपछडे बोरगावकर, मारोती हाणेगावे, राजू पाटील भोखेसखेडकर, अनिल कमटलवार, सविता कमटलवार, फिरदोस फातेमा, शिवकांत अप्पा धडेले, बालाजी कांबळे, हनुमाने सर यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. एकूणच, राष्ट्रसेवेचा संकल्प, जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांच्या समर्पणातून उभी राहिलेली भाजपाची परंपरा अधिक बळकट करण्याचा निर्धार देगलूरमध्ये या वर्धापन दिनानिमित्त व्यक्त करण्यात आला.

# किनवटचा जागतिक ठसा; सुहास नेम्मानिवार यांच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पेटंट मान्यता

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ८ एप्रिल -**

नांदेड जिल्ह्यातील किनवटसारख्या छोट्या शहरातून पुढे येत जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करणारे सुहास उद्धवराव नेम्मानिवार यांनी पुन्हा एकदा उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. त्यांच्या सहभागातून विकसित करण्यात आलेल्या अत्याधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञानाला पेटंट को-ऑपरेशन ट्रीटी (PCT) अंतर्गत आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली असून, थज २०२५/0१२८00१ या क्रमांकाने नुकतेच जागतिक स्तरावर त्याचे प्रकाशन करण्यात आले आहे. हे संशोधन पुणे येथील औषध पॅकेजिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी Bilcare Limited मार्फत सादर करण्यात आले असून, संशोधकांच्या टीममध्ये सुहास नेम्मानिवार यांच्यासह अनेक तज्ज्ञांचा समावेश आहे. या यशामुळे किनवट तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर झळकले आहे.

### शैक्षणिक व व्यावसायिक प्रवास प्रेरणादायी

सुहास नेम्मानिवार यांनी पुणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (उजएझ) येथून बी.ई. मटेरियल सायन्स (Metallurgy) ही पदवी संपादन केली आहे. अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून शिक्षण घेत त्यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर पुण्यासारख्या स्पर्धात्मक शहरात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. संशोधनाच्या क्षेत्रात कार्य करताना त्यांनी जगातील अनेक देशांचा दौरा करून आंतरराष्ट्रीय अनुभव मिळवला आहे. गेल्या ३0 वर्षांपासून ते या क्षेत्रात कार्यरत असून, विशेषतः २00७ पासून व्यावसायिक दृष्ट्या आरोग्य क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावत आहेत.

### आंतरराष्ट्रीय स्तरावरील जबाबदारी

सध्या सुहास नेम्मानिवार हे Bilcare Limited या जगातील मानवी औषधांच्या पॅकेजिंग क्षेत्रातील अग्रगण्य व दुसऱ्या क्रमांकाच्या कंपनीमध्ये जागतिक पातळीवर उपाध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्प यशस्वीरीत्या राबविण्यात आले आहेत.

### संशोधनाचे वैशिष्ट्य व महत्त्व

त्यांच्या सहभागातून विकसित करण्यात आलेले Mechanically Strengthened Multilayer, Multibarrier, Desiccant Interlaced Cold Formable Blister Laminates हे तंत्रज्ञान औषधे, वैद्यकीय उपकरणे, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांसारख्या संवेदनशील उत्पादनांच्या सुरक्षित पॅकेजिंगसाठी अत्यंत उपयुक्त आहे. या तंत्रज्ञानामुळे: आर्द्रता, प्रकाश व गॅसपासून उच्च दर्जाचे संरक्षण मिळते उत्पादनाचे शेल्फ लाइफ वाढते पॅकेजिंग अधिक मजबूत व टिकाऊ बनते वाहतूक व साठवण दरम्यान नुकसान होण्याची शक्यता कमी होते

### किनवटचा अभिमान, युवकांसाठी प्रेरणा

ग्रामीण भागातून जागतिक स्तरावर पोहोचलेले सुहास नेम्मानिवार यांचे हे यश अत्यंत प्रेरणादायी आहे. किनवटसारख्या लहान शहरातून सुरुवात करून त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे स्थानिक पातळीवर अभिमानाची भावना निर्माण झाली असून, युवकांना शिक्षण, संशोधन व उद्योग क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळत आहे.



तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परभणी महापालिकेद्वारे जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी आता ऑनलाईन होणार

**परभणी,/प्रतिनिधी** - महापालिकेद्वारे जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी आता ऑनलाईन होणार : घरबसल्या मिळणार महापालिकेच्या सेवा; नागरिकांचा वेळ वाचणार आहे.

परभणीमहानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणारी महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली असून, प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी तसेच नागरिकांचा वेळ वाचवण्यासाठी महानगरपालिकेचे महत्त्वाचे विभाग आता पूर्णपणे ऑनलाईन करण्यात येत आहेत. यामध्ये जन्म-मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी आणि आरोग्य विभागाशी संबंधित सेवा लवकरच घरबसल्या उपलब्ध होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन महापौर सय्यद इक्बाल, उपमहापौर गणेश देशमुख, सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला, गटनेते दिलीप ठाकूर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी तथा निबंधक कल्पना सावंत यांच्यासह आकाश लहाने, सय्यद इलाही, शुभम पाष्टे, अमोल जाधव, संदीप पवार, नजम खान आदी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान जन्म-मृत्यू नोंदणी विभागाला तीन संगणक, तीन स्कॅनर आणि तीन प्रिंटर उपलब्ध करून देण्यात आले.




महानगरपालिकेत विविध दाखल्यांसाठी नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागत असल्याने ही अडचण दूर करण्यासाठी प्रशासनाने सर्व सेवा डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या प्रणालीमुळे नागरिकांना जन्म किंवा मृत्यूची नोंदणी करणे आणि अधिकृत प्रमाणपत्र डाउनलोड करणे सुलभ होणार आहे. तसेच, विवाह नोंदणीसाठी अर्ज ऑनलाईन भरता येणार असून आवश्यक कागदपत्रे अपलोड करून अपॉइंटमेंट घेण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. आरोग्य विभागाशी संबंधित विविध परवाने, तक्रारी आणि माहितीही पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या सुविधेमुळे नागरिकांचे श्रम आणि वेळ मोठ्या प्रमाणात वाचणार असून, रांगेत उभे राहण्याची गरज उरणार नाही. अर्जाची सद्यस्थिती मोबाईलवरून पाहता येणार असून, डिजिटल स्वाक्षरी असलेली प्रमाणपत्रे थेट डाउनलोड करता येणार असल्याने कार्यालयात जाण्याची आवश्यकता कमी होणार आहे.

ही योजना येत्या काही दिवसांत अधिकृतपणे सुरू होणार असून, त्यासाठी विशेष पोर्टल किंवा मोबाईल ॲपची लिंक महानगरपालिकेतर्फे जाहीर करण्यात येणार आहे. नागरिकांनी 'नागरिकसहाय्यवाणी' या पोर्टलचा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे महापालिकेच्या कामकाजात पारदर्शकता वाढेल तसेच दप्तरदिरंगाईला आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, परभणी शहराला स्मार्ट बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पारदर्शक आणि जलद सेवा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. ही योजना लवकरच कार्यान्वित होईल आणि सर्व नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केले.यामुळे नागरिकांची चांगलीच सोय होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### तुकाराम मुंढे यांची बदली रद्द करा : दिव्यांग बांधवांचे परभणीतून राज्य सरकारला साकडं : जिल्हा प्रशासनास निवेदन सादर

**परभणी,/प्रतिनिधी-** महाराष्ट्रातील धडाकेबाज आणि शिस्तप्रिय सनदी अधिकारी (आयएएस) तुकाराम मुंढे यांची राज्य सरकारने केलेल्या बदलीचा आदेश तात्काळ रद्द करावा, अशी मागणी संतप्त दिव्यांग बांधवांनी जिल्हा प्रशासनामार्फत राज्य सरकारला पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

दिव्यांग विकास आघाडीचे मराठवाडा विभाग प्रमुख सुनील मुलगीर यांच्यासह बालासाहेब घाटूळ, भगवानराव वाघमारे, भारत कटारे, लक्ष्मण कदम, विश्वांभर कदम, श्रीकृष्ण सानप, जनार्दन सूर्यवंशी, रमेश मठपती, ओंकार गडदे, नवनाथ कदम, लक्ष्मण लांडगे, चंद्रकांत घोडे, महादू गायकवाड, विश्वनाथ भालेराव, पुजा कस्तुरकर, लक्ष्मण खंदारे, मारोती चव्हाण, अनंता रणेर, रसूल पठाण, लक्ष्मण गोरे, सचिन वाघमारे, काळूबाई वाघमारे, आश्रोबा आव्हाड, सूर्यकांत बनसोडे, शैलेश नवघडे, अनंता रणेर, योगानंद घुगे, रामराव नालेगांवकर आदी दिव्यांग बांधवांनी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय गाठून त्या संबंधीचे निवेदन सादर केले.

तुकाराम मुंढे यांची ३१ मार्च २०२६ च्या आदेशानुसार, दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिव पदावरून आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यामुळेच दिव्यांग बांधवात कमालीचा संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे संतप्त दिव्यांग बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठून आपला रोष व्यक्त केला. मुंढे यांची बदली तातडीने रद्द करावी, अशी जोरदार मागणी केली. मुंढे यांच्यामुळेच महाराष्ट्रातील दिव्यांग बांधव मुख्य प्रवाहात येण्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरु होत्या. दिव्यांग बांधव स्वावलंबनाकडे निघाले होते. मुंढे यांच्या कारकिर्दीतच दिव्यांग कल्याण विभागात आमूलाग्र असा बदल झाला होता. त्यामुळेच लाखो दिव्यांग बांधवात एक आशेचा किरण निर्माण झाला होता, अशी प्रतिक्रिया या दिव्यांग बांधवांनी यावेळी व्यक्त केली. एखाद्या विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्याची या पध्दतीने राज्य सरकारने बदली करावी, हे दुर्दैव आहे, असे या निवेदनाद्वारे म्हटले

### अखिल भारतीय नागरी सेवा सांस्कृतिक स्पर्धेत परभणीच्या दत्तात्रय राऊत यांना सुवर्णपदक : जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय संघटनेच्या वतीने सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** देशाची राजधानी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा सांस्कृतिक स्पर्धेमध्ये परभणी जिल्ह्याचे शिक्षण विभागातील लेखाधिकारी दत्तात्रय राऊत यांनी उत्कृष्ट अभिनयाच्या जोरावर सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र मिळवून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्र शासनाच्या संघामध्ये त्यांची निवड झाली होती. त्यांनी निर्णय या एकांकिकेमध्ये कुटुंब प्रमुख (सासरा) ही भूमिका प्रभावीपणे साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या प्रभावी अभिनयामुळे निर्णय ही एकांकिका देशात प्रथम क्रमांकावर ठरली आणि संघाला सुवर्णपदक मिळाले.

या स्पर्धेत देशातील एकूण २२ राज्यांतील एकांकिका सादर करण्यात आल्या होत्या. या कठीण स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने उत्कृष्ट अभिनयाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत आपली छाप पाडली. यामध्ये दत्तात्रय राऊत यांना उत्कृष्ट अभिनयासाठी सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहाय्यक लेखाधिकारी राजेंद्र थोटे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन भुरेवार, उपाध्यक्ष रामदास पवार, सदस्य पंजाब भेरजे, गंगाखेड तालुकाध्यक्ष दीपक शिगोटे, पूर्णा तालुका अध्यक्ष गोविंदप्रसाद सोनी तसेच शिवाजी चांदणे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना अतिरिक्त कामाच्या ताणातही अभिनयाचा छंद जोपासून देशपातळीवर प्रथम क्रमांक मिळवणे ही बाब परभणी जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### भाजपाच्या ८ सदस्यांद्वारे स्विकृत सदस्य व विरोधी पक्षनेता निवडीची प्रक्रिया पुढे ढकलण्याची मागणी : आयुक्तांसह महापौरांना सोमवारी पत्र सादर

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या आगामी विशेष सभेत भारतीय जनता पार्टीच्या स्विकृत सदस्याच्या निवडीसह विरोधी पक्ष नेता निवड हे दोन्ही विषय पुढच्या सभेपर्यंत पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या ११ पैकी ८ नवनिर्वाचित सदस्यांनी आयुक्त व महापौरांना सादर केलेल्या पत्राद्वारे केली आहे.

हे दोन्ही विषय या विशेष सभे अंतर्गत न घेता ते पुढील सभेत घ्यावेत, असे भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित सदस्य डॉ. केदार खटींग, रितेश झांबड, गणेश टाक, विश्वजित बुधवंत, सौ. गिरीजा शंकर आजेगांवकर, सौ. सपना जुकटे, वैशाली दैठणकर, सौ. मीना सुरेश वरपुडकर यांनी म्हटले आहे. एकूण ११ पैकी ८ सदस्यांच्या या पत्रावर स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, गुरुवार ९ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता महापालिकेच्या बी. रघुनाथ सभागृहात विशेष सभा होणार आहे. महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांनी या सभेच्या सूचनाही दिल्या आहेत. सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवर ०३ नुसार विविध महत्त्वाचे विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले आहेत. यामध्ये विषय क्र. ०६ अंतर्गत महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २०(२) अन्वये स्थायी समितीच्या एकूण १६ सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत निर्णय, सुधारित कलम ३१-अ नुसार महापालिकेतील पक्ष किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, तसेच विषय क्र. ०७ अंतर्गत दि. ४ ऑगस्ट २०१२ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ८ नुसार स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीवर सदस्य नियुक्तीचा विषयही चर्चेसाठी समाविष्ट करण्यात आला आहे. भारतीय जनता पार्टीच्या या नवनिर्वाचित सदस्यांनी दिलेल्या या पत्रामुळे भाजपाच्या स्विकृत सदस्यासह स्थायी समितीवरील अन्य सदस्यांच्या निवडीचा विषय महापौर पुढे ढकलणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### जिल्हयात वाढला उन्हाचा पारा

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरात मोठया प्रमाणात उन्हाचा पारा वाढलेला दिसून येत आहे.सध्या एप्रिल महिन्याचा पहिला आठवडा आहे. त्यामुळे नागरिकांना आपल्या दैनंदिन कामे तसेच लहान मुलांचे शिक्षण यासाठी बाहेर गावी जावे लागत असल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.अशातच वेळोवेळी आपण सर्वांनी उन्हापासून बचाव करण्यासाठी शीपतेय, कुलर आदी साधनांचा वापर सर्रासपणे करित आहोत. त्यामुळे काहीअंशी का होईना पण उन्हामुळे नागरिकांची चांगलीच पिछेहाट दिसून येत आहे. त्याचा परिणाम म्हणजे आणखीन काही दिवसांत नागरिकांना अशाच प्रकारच्या वातावरणाचा सामना करावा लागणार असल्याचे दिसून येत आहे.

## पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन : व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी:** पत्रकारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने मंगळवारी (दि. ७) येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्हाभरातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

या वेळी पत्रकार सुरक्षा कायदा २०१९ ची तातडीने अंमलबजावणी करावी, पत्रकारांवरील हल्ले व धमकावण्याचे प्रकार रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अधिस्वीकृती संदर्भातील अटी शिथिल कराव्यात, तसेच वर्तमानपत्रांच्या शासकीय जाहिरात दरात वाढ करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. याशिवाय, ज्येष्ठ पत्रकार सन्माननिधीसाठी असलेली ३० वर्ष सेवा ही अट रद्द करावी, तसेच एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना सवलतीचा लाभ द्यावा, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया, राज्य सहचिटणीस सूरज कदम, राज्य सहसंघटक विजय पाटील, मराठवाडा कार्यकारिणी सदस्य सुरेश जंपणगिरे, दिलीप माने, प्रवीण चौधरी, विशाल माने, तसेच जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख आणि जिल्हा कार्याध्यक्ष कैलास चव्हाण यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. आंदोलनादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले.

धरणे आंदोलनात जिल्ह्यातील अनेक पत्रकार सहभागी झाले होते. त्यामध्ये मारुती जुंबडे, बालासाहेब काळे, श्रीकांत देशमुख, राजन मंगरूळकर, विजय कुलकर्णी, विष्णू सायगुंडे, नरहरी चौधरी, नेमिनाथ जैन, मंचक देशमुख, दिलीप बोरूळ, भागवत चव्हाण, शेख अनवर लिंबेकर, सुभाष सुरवसे, भास्कर लांडे, नारायण सोनटक्के, कचरूलाल बारहाते, गजानन घुंबरे, सय्यद युसुफ, शिवाजी वाघमारे, विवेक मुंदडा, दत्तात्रय कराळे, मंदार कुलकर्णी, दिवाकर माने, लक्ष्मीकांत रासवे, लक्ष्मण कछवे, अनिल अहिरे, सोमनाथ स्वामी, आनंद मुरक्या, भास्करराव चौधरी, रामा ढाकरगे, तुकाराम सर्जे, रंगनाथ गडदे, प्रभाकर कुरे, सचिन रायपत्रीवार, संग्राम खेडकर, रियाज कुरेशी, शिवाजी बोबडे, रामप्रसाद ओझा, गजानन साबळे, शिवाजी शिंदे, लक्ष्मीकांत सराफ, बाळासाहेब घिके, शंकरराव झटे, धनंजय धबाले, शैलेश काटकर आणि रमेश बिजुले आदींचा समावेश होता. पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी झालेल्या या आंदोलनातून शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली.

## विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सेनगाव तहसीलची बाजी

**परभणी,/प्रतिनिधी-** विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सेनगाव तहसीलची बाजी मारण्यात आली आहे.
छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन परभणी महसूल विभागाकडून ३ एप्रिल ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धे त सेनगाव तहसील कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदके पटकावली आहेत.



प्रमुख ठळक मुद्दे: तहसीलदार सखाराम मांडवगडे यांचे यश: सखाराम मांडवगडे यांनी लॉन टेनिस (वैयक्तिक खुला गट) आणि ४५ वर्षांवरील गट या दोन्ही प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले.इतर विजेते खेळाडू
राजू जांबुतकर (ग्राम महसूल अधिकारी): ४५ वर्षांवरील पुरुष गट जलतरण (५० मी. बॅकस्ट्रोक, १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक), भालाफेक आणि ३ किमी चालणे या चारही प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला.गोपीचंद वराड (महसूल सेवक) उंच उडी पुरुष गटात तृतीय क्रमांक आणि रिले धावणे (४००४ मी.) स्पर्धेतही यश मिळवले.
अनिरुद्ध घुगे:४०० मीटर धावणे (पुरुष गट) स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.
एकूण कामगिरी सेनगाव तहसील प्रशासनाने एकूण दहा पदकांची कमाई केली आहे.
प्रशासकीय उपस्थिती:
या यशाबद्दल विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, आणि अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी सर्व सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

### संगणक चांलकांचे निषेध आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :**
शहरातील संगणक चांलक हे गेल्या काही दिवसापासून अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे त्यांना व्यवसाय वाढीसाठी तसेच ग्राहकांची वाढणारी मागणी करिता होणारे साहित्य न मिळणे यासह अन्य कारणामुळे हे निषेध आंदोलन करण्यात आले होते.

## गोदावरी नदीच्या पात्रात बुडून विद्यार्थ्याचा मृत्यू : अन्य दोघे बचावले

**परभणी,/प्रतिनिधी:** गोदावरी नदीच्या पात्रात बुडून विद्यार्थ्याचा मृत्यू : अन्य दोघे बचावले आहेत.
नदीच्या पात्रातील पाण्यात पोहण्याकरीता उतरलेल्या एका विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाला. तर अन्य दोघे नदीपात्राच्या बाहेर पडल्याने बचावले.

गंगाखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका वसतीगृहात वास्तव्यास असणाऱ्या रितेश राजाराम कदम (वय १३) या इयत्ता सातवीतील विद्यार्थ्याने मित्रांसमवेत धारखेड येथील गोदावरी नदीच्या पात्रात पोहण्याकरीता उड्या मारल्या. परंतु, पाण्याचा अंदाज न आल्याने कदम हा विद्यार्थी गटांगळ्या खात बुडून मृत्यू पावला. अन्य दोघे कसबसे पात्राबाहेर पडल्याने बचावले. सोमवारी दुपारी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास ही दुर्देवी घटना घडली. स्थानिक मंडळींनी धाव घेऊन शोध कार्य सुरु केले. तब्बल दोन तासानंतर या विद्यार्थ्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. दरम्यान, या दुर्देवी घटनेबद्दल गंगाखेड पोलिस ठाण्यात पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे.

### परभणीतील रस्ते सुमसाम

**परभणी,/प्रतिनिधी :**
शहरातील रस्ते हे गेल्या काही दिवसापासून दुपारच्या सुमारास चांगलेच सुमसाम दिसून येत आहे. सध्या जिल्हयात उन्हाचा पारा ४०अंशावर गेला आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या सुमारास घराबाहेर पडणे म्हणजेच अतिशय त्रास होत असल्याच्या पार्श्वभुमीवर बाहेर न पडणेच पसंत केले आहे.

## नांदेड रेल्वे विभागाचा डिजिटल क्षेत्रात विक्रम; ७० टक्के तिकीट व्यवहार नॉन-काउंटरवर

**परभणी ,/प्रतिनिधी:** नांदेड रेल्वे विभागाचा डिजिटल क्षेत्रात विक्रम; ७० टक्के तिकीट व्यवहार नॉन-काउंटरवर होणार आहे.

परभणी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवित ७० टक्के नॉन-काउंटर तिकीट व्यवहार साध्य केले आहेत. दक्षिण मध्य रेल्वेतील सर्व विभागांमध्ये हा आकडा सर्वाधिक ठरला असून, नांदेड विभागाने डिजिटल अंगीकारात आघाडी घेतल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

नांदेड विभागाने डिजिटल पेमेंट्स तसेच पेपरलेस तिकीट प्रणालीचा प्रसार करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांमुळे प्रवाशांना अधिक सोयीस्कर, जलद व कार्यक्षम सेवा उपलब्ध होत असून, रेल्वे प्रवास अधिक सुलभ झाला आहे. विशेष म्हणजे, डिजिटल युटीएस (अनारक्षित तिकीट प्रणाली) व्यवहारांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल १०० टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे, ही बाब विभागाच्या यशाची ठळक नोंद मानली जात आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सिकंदराबाद येथे आयोजित कार्यक्रमात प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक श्रीमती इति पाण्डेय यांच्या हस्ते नांदेड विभागाला सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. या सन्मानामुळे विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, डिजिटल व्यवहारांना अधिक चालना देण्यासाठी नांदेड विभागात उद्या ८ एप्रिल २०२६ रोजी डिजिटल पेमेंट डे साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने नांदेड, परभणी, पूर्णा, जालना, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वाशिम आणि आदिलाबाद या प्रमुख स्थानकांवर जनजागृती मोहीम, प्रात्यक्षिके तसेच प्रवासी संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांद्वारे प्रवाशांना डिजिटल माध्यमांचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून, अधिकाधिक प्रवाशांनी रोखरहित व्यवहार स्वीकारावेत, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

रेल्वे प्रवाशांसाठी विविध डिजिटल माध्यमे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यामध्ये आयआरसीटीसी रेल कनेक्ट या अनुप्रयोगाद्वारे आरक्षित तिकीट बुकिंग करता येते, तर रेलवन या एकात्मिक अनुप्रयोगाच्या माध्यमातून विविध रेल्वे सेवा सहज उपलब्ध होतात. तसेच भीम आणि यूपीआय ॲप्सच्या माध्यमातून त्वरित डिजिटल पेमेंट करता येते. याशिवाय, क्यूआर कोड आधारित तिकीट व्यवस्था आणि स्थानकांवरील पीओएस यंत्रणेमुळे प्रवाशांना अधिक सुलभ सुविधा मिळत आहेत.




डिजिटल माध्यमांचा अवलंब केल्यामुळे प्रवाशांना रांगेत उभे राहण्याची गरज राहत नाही, व्यवहार जलद होतात, रोख रक्कम बाळगण्याची आवश्यकता कमी होते आणि व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शक होतात. तसेच संपर्करहित सेवेमुळे स्वच्छता आणि सुरक्षितता वाढण्यास मदत होत असून, २४ तास कोणत्याही ठिकाणाहून तिकीट बुकिंगची सुविधा उपलब्ध होत आहे.

एकूणच, नांदेड रेल्वे विभागाने डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने ठोस पावले उचलत आधुनिक, कार्यक्षम आणि प्रवासी-केंद्रित सेवा देण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुनर्प्रतिष्ठा केली असून, भविष्यातही अशाच प्रकारे नवे मापदंड प्रस्थापित करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.